


गुन्हेगारीचा कर्दनकाळ
# क्राईम संध्या
TM Tread Mark
संपादक : लक्ष्मणराव पाटोळे
वर्ष : ९ | अंक : ३२ | सोमवार दि. ०२ ऑगस्ट २०२१ ते रविवार दि. ०८ ऑगस्ट २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/- रुपये
www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com
ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

## कसले पोलीस आणि कसले सरकार लोक झालेत बेजार डॉक्टरच विकतात बनावट औषधे कसा जाईल आजार

उदगीर/राम पाटोळे




उदगीर कोरोनाच्या संकट काळात खाजगी रुग्णालयांकडून रुग्णांच्या नातेवायीकांची कशाप्रकारे लुटमार सुरु होती. त्यानंतर जनतेचा कसा उद्रेक झाला व सरकारला कशा प्रकारे या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी लागली हे संपूर्ण महाराष्ट्राला ठाऊक आहे. त्याच बरोबर कोरोनावर प्रभावी ठरणाऱ्या रेमडेसिवीर इंजेक्शनच्या काळाबाजार उघडकीस आल्यानंतर अन्न आणि औषध प्रसाधन विभाग व पोलिसांची कशाप्रकारे धावपळ उडाली होती हे सुद्धा महाराष्ट्राने पाहिले आहे. हे भयंकर प्रकार उघडकीस आल्यानंतर महाराष्ट्र सरकारने त्याची गंभीर दाखल घेऊन रेमडेसिवीरचा काळाबाजार रोखण्यासाठी पोलिसांना सक्त आदेश दिले होते, पण सरकारच्या या आदेशाला पोलीस आणि अन्न व औषध प्रसाधन विभागाने अक्षरशः केराची टोपली दाखवली. त्यामुळे रेमडेसिवीरचा काळाबाजार अजूनही खुलेआम सुरु आहे. लातूर जिल्ह्यातील उदगीरमध्ये चक्क डॉक्टरांनीच रेमडेसिवीरची सहा इंजेक्शन ९० हजार रुपयांना एका पेशंटच्या नातेवाईकांना विकली आणि धक्कादायक बाब म्हणजे हि सर्व इंजेक्शन बनावट निघाली. या प्रकरणी उदगीरच्या उदयगिरी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेल्या पेशंट महिलेचा मुलगा महेशकुमार त्र्यंबकराव जीवने याने उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवायला गेला असता तेथील पोलीस अधिकारी दीपक वाघमारे यांनी त्यांची त्याची फिर्याद देखील नोंदवून घेतली नाही. शेवटी त्यांनी हे प्रकरण पोलीस महासंचालक, आयजी, एसपी आणि डिवायएसपीपर्यंत नेले, तेंव्हा कुठे १७/७/२०२१ रोजी त्यांची फिर्याद नोंदवून घेण्यात आली.




उदयगिरी हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी महेशकुमार त्र्यंबकराव जीवणे याला काळ्या बाजाराने प्रत्येकी १५ हजार रुपयांना ६ इंजेक्शन विकली. मात्र ही इंजेक्शन बनावट असल्याचे कंपनी सांगतेय ही बाब आम्ही पोलिसांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही पोलिसांनी आरोपीला १८ ते २० दिवस उलटूनही अटक केली नाही. त्यामुळे उदगीरची जनता संतापली असून पोलीस निरीक्षक दीपक वाघमारे यांनी आर्थिक साटेलोटे करून आरोपी डॉक्टरांना वाचवण्याचा केविलवाणा प्रयत्न चालवला आहे असा आरोप करून दीपक वाघमारेंची यांची चौकशी करून त्यांना तत्काळ पोलीस सेवेतून निलंबित करण्याची मागणी केली आहे. तसेच आरोग्यमंत्री व मुख्यमंत्र्यांनीही या प्रकरणाची गंभीर दाखल घेऊन चौकशीचे आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे.

बनावट रेमडेसिवीर इंजेक्शन डॉक्टरांनीच कोरोना बाधित पेशंटच्या मुलाला विकल्याचा संतापजनक प्रकार लातूर जिल्ह्यातील उदगीरच्या उदयगिरी हॉस्पिटलमध्ये उघडकीस आला आहे. महेशकुमार त्र्यंबक जीवणे हे पेशाने इंजिनियर आहेत आणि ते पुणे येथे सॉफ्टवेअर सल्लागार म्हणून काम करतात. मात्र सध्या ते उदगीरच्या हिंदुस्तान कॉलनी बिदर रोड येथे राहतात. त्यांच्या मातोश्री शांताबाई त्र्यंबक जीवणे (७२) यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना १२/४/२०२१ रोजी ...पान ६ वर


बनावट इंजेक्शनमुळे शांताबाई जीवणे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला

## स्थानिक तरुणांच्या धाडसामुळेच विरारच्या आयसीआयसीआय बँकेवरील दरोडा फसला

**महिला अधिकारीची हत्या; रोखपाल जखमी; आरोपीला अटक**


दुर्दैवी योगिता(मृतक)





आरोपी अनिल

विरार/क्राईम रिपोर्टर

आज काल गुन्हेगारी इतकी वाढली आहे कि सरकार आणि पोलिसांच्या भरोशावर जो अवलंबून राहील त्याचे काही खरे नाही. त्यामुळे प्रत्येक माणसाने जाता येता स्वतःही सावध राहायला हवे आणि सार्वजनिक ठिकाणी जर एखाद्यावर संकट आले तर पोलिसांची वाट न बघता स्वतः पुढे होऊन त्या माणसाला वाचवायला हवे. यालाच म्हणतात मनुष्यधर्म जो विरार मधील धाडसी तरुणांनी दाखवून दिला आणि आयसीआयसीआय बँकेच्या दोन कर्मचारी महिलांचे प्राण वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र एकीचा जागेवरच मृत्यू झाला होता, तर दुसरी जखमी महिला उपचारासाठी तडफडत असताना तेथून हाकेच्या अंतरावर असलेल्या आणि कोरोना काळात रुग्णाची लूट करणाऱ्या मनवेल पाडा रोडवरील भूषण हॉस्पिटलमध्ये तिला नेले असता तेथील डॉक्टरांनी जराही माणुसकी न दाखवता वेदनेने तडफडणाऱ्या त्या महिलेला तेथून दूर विरार पूर्वेला असलेल्या संजीवनी हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी सांगितले. त्यामुळे तिला वाचवण्याच्या प्रयत्नात असलेल्या त्या तरुणांनी तत्काळ तिला संजीवनी रुग्णालयात दाखल केले. जिथे तिच्यावर उपचार सुरु आहेत. मात्र या घटनेचा धाडसाने सामना करून दोन महिलांपैकी एकीचे प्राण वाचवणाऱ्या आणि आरोपीला पकडून देणाऱ्या त्या तरुणांचे वसई, विरार, नालासोपारा परिसरात कौतुक केले जात आहे. ...पान ६ वर




## गतीमंद असल्याने त्याचे लग्न नाही झाले दारूड्या मुलाने जन्मदात्या बापाला ठार केले

जत/क्राईम रिपोर्टर



मुलांना आई-वडिलांनी लहानपणीच चांगले वळण लावायचे असते, तरच मोठेपणी ती सुधारतात आणि आई बापासाठी त्यांच्या म्हातारपणाचा आधार ठरतात. पण कधी कधी मुले गतीमंध असली कि त्यांच्या कडून आई-बापाच्या अपेक्षा पूर्ण होत नाही. त्यामुळे आई-बाप मुलावर चिडतात. नोकरीधंदा करण्यासाठी त्याच्या मागे लागतात. पण मुले काही ऐकत नाहीत. अशातच मुलाला वाईट संगत जडली आणि त्यातून दारूचे व्यसन लागले कि घरातली परिस्थिती आणखी बिघडते, जत तालुक्यातील आसंगी गावात राहणाऱ्या देवाप्पा मोडे यांच्या बाबतीत सुद्धा असेच झाले, त्यांचा गतिमंद मुलगा दारुडा निघाला सतत दारूसाठी आई बापाला छळू लागला आणि आता तर त्याने लग्नाचा हत्त धरला होता. त्यावरून घरात भांडणे सुरु होती, याच भांडणात एकेदिवशी बापाने त्याला चपलेने मारले त्याचा राग धरून त्याने बापाचा खून केला. तसेच आईलाही भोसकले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

जत तालुक्यातील आसंगी येथे देवाप्पा खिराप्पा मोडे हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. गावात त्याची शेती असल्याने त्या शेतीवरच त्याची उपजिविका होत होती. त्यांनी ...पान २ वर

## विश्वासघातकी मित्रांमुळे मैत्रीचा खून झाला मित्राला ठार मारून अपघाताचा बनाव केला

धुळे/क्राईम रिपोर्टर

मैत्री किती जरी घनिष्ट असली तरी आजकाल मित्रांचा भरोसा नसल्याने कुठल्याही कुटुंब वत्सल सज्जन माणसाने मित्रांना घरापर्यत आणू नये आणि आणले तरी ते चुलीपर्यंत डोकावणार नाहीत याची काळजी घ्यावी. दुर्दैवाने शिक्षक असलेल्या संदीपने हि काळजी घेतली नाही म्हणून त्याला जीव गमवावा लागला. संदीपच्या मित्राची त्याच्या पत्नीवर सुरुवातीपासूनच वाईट नजर होती. त्यामुळे त्याने तिच्यावर जाळे टाकले आणि तीही त्याच्या जाळ्यात फसली. मात्र दोस्तीत केलेल्या या गद्दारीचा संदीपला सुगावा लागताच तो भयंकर चिडला आणि त्याने गद्दार मित्राला आपल्या घराचे दरवाजे बंद केले. पण मित्राच्या बायकोच्या शरीराची चटक लागलेला संदीपचा मित्र कावेबाज गोता त्याने संदीपलाच मार्गातून हटवण्याचा प्लान केला आणि एकेदिवशी त्याला बाहेर गाठून दारू पाजून ठार मारले आणि अपघाताचा बनाव केला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने या दगाबाज आरोपी मित्राला अटक केली.




मयत संदीप

संदीप विश्वासराव बोरसे आणि राकेश मधुकर कोळी हे दोघे बालपणीचे मित्र होते. धुळे तालुक्यातील सरवड या गावी दोघे रहात होते. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण आटोपल्यानंतर दोघांनी आपआपला अर्थार्जनाचा मार्ग निवडला. संदीप हा धुळे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरीला लागला तर राकेश शेती करु लागला. शिक्षकी पेशा सांभाळणारा संदीप बोरसे आणि शेती सांभाळणारा राकेश कोळी हे दोघे बालपणीचे मित्र आता तरुण झाले होते. दोघांची बालपणापासून असलेली मैत्री साऱ्या गावाला परिचीत होती. जवळच असलेल्या पाडळदे या गावी राहणारा शरद दयाराम राठोड हा तरुणदेखील आता त्यांचा मित्र झाला. त्यामुळे संदीप, राकेश आणि शरद हे ...पान २ वर

## महिलेला ठार मारून सुटकेसमध्ये भरले अजूनही कळेना हे हत्याकांड कुठे घडले

वसई/राजेंद्र वेदांते





कोणताही गुन्हा कधी लपून राहत नाही, कधीना कधी त्याला वाचा फुटत असते. पण त्यासाठी पोलिसांना खूप मेहनत घ्यावी लागते. कारण आजकाल गुन्हेगार इतके शातीर झालेत कि त्यांना ज्याची हत्या करायची असते, त्याची ओळखच पटणार नाही अशा पद्धतीने हत्या करतात आणि तितक्याच हुशारीने मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करतात. वसईच्या भुईगाव समुद्र किनाऱ्यावर अशाच एका समुद्रातून वाहत आलेल्या बेवारस सुटकेसमध्ये एका अनोळखी महिलेचा हेडलेस मृतदेह सापडलाय. आता पोलीस त्या महिलेची ओळख पटवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे तिला कोणी आणि का मारले? तसेच ती महिला कोण होती? या प्रश्नाची उत्तरे मृतदेहाची ओळख पटल्यावरच मिळणार आहेत.

एखाद्याची हत्या करणे किंवा त्याचा कायमचाच काटा काढणे सहज शक्य आहे. परंतू हत्या केलेल्या मृतदेहाची विल्हेवाट लावणे कठीण असते. पोलिसांच्या कारवाईपासून वाचायचे ...पान २ वर

## कोरोनाच्या काळातही बदल्यांचे रॅकेट खुलेआम चाले आरोग्य उपसंचालक डॉ.एकनाथ माले मालामाल झाले

देवणी/शकिल मनियार

प्रशासनातील बदल्यांमध्ये होणारा भ्रष्टाचार हा काही नवीन विषय नाही. पण सध्याच्या कोरोनाच्या संकटाच्या काळात आरोग्य विभागासारख्या महत्वाच्या विभागात भ्रष्टाचार होणे हि गंभीर बाब असून त्याही पेक्षा जर गंभीर काय असेल तर केवळ पैशासाठी आरोग्य विभागातील रिक्त जागा न भरणे आणि त्यामुळे रुग्णांची गैरसोय करणे. त्यामुळे अशा गोष्टीना जबाबदार असणाऱ्या आरोग्य विभागातील बड्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करायला हवी. असाच काहीसा प्रकार मराठवाड्यात उघडकीस आला आहे.



लातूरचे आरोग्य उपसंचालक डॉ.एकनाथ माले यांच्याकडे लातूरसह नांदेड, बीड, उस्मानाबाद या चार जिल्ह्यांची जबाबदारी आहे. मात्र माले साहेब कोरोनाच्या संकट काळाला माल गोळा करण्याचा सुकाळ समजत असल्याने आरोग्य विभागात बदल्या आणि बढत्यांची प्रकरणे केवळ पैसे कमावण्याच्या हेतूने वेटिंगवर ठेवली आहेत. पण ज्या उमेदवारांनी डॉ.मालेंना दीड ते दोन लाख देवून मालामाल केले त्यांना मात्र त्यांच्या इच्छित स्थळी बदली किंवा बढती देण्यात आली. कोरोनाच्या संकट काळात आतापर्यंत खाजगी रुग्नालायेच रुग्णांची लूट करीत होते. पण स्वतःची झोळी भरण्यासाठी आरोग्य विभागातील उपसंचालक दर्जाचे बडे अधिकारीच जेंव्हा या संकट काळात बदल्या आणि बढत्यांमध्ये भ्रष्टाचार ...पान २ वर

## सात फेरे घेतले निभवण्या जन्मोजन्मीची साथ पहिले लफडे उघड होताच पोलीस पती आत

नळेगांव/सुरेश फरकांडे

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कळमगाव येथील एका मुलीचा विवाह उस्मानाबाद तालुक्यातील चिखली गावातील श्रीहारी भानूदास जाधव यांचा मुलगा प्रविण श्रीहारी जाधव यांच्यासोबत ठरला. प्रविण श्रीहारी जाधव लातूर हे पोलिस दलात सेवा बजावत होते. वधु पित्याने दि.३० जानेवारी २०२१ रोजी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कळमगाव येथे रितपरवाजाप्रमाणे आपल्या मुलीचे लग्न प्रविण श्रीहारी जाधव यांच्या सोबत लावून दिले.

लग्नात वरदक्षणा म्हणून २० तोळे सोने व ११ लाख रूपये वर पक्षाला दिले. लग्नानंतर मुलगी नांदवयास उस्मानाबाद तालुक्यातील चिखली गावी गेली. दरम्यानच्या काळत नवीन जोडप्याचे शररीक संबध प्रस्थापित झाले. काही दिवसानंतर प्रविण जाधव नव वधुला लातूर येथे राहत आसलेल्या पोलिस वसहातीत राहण्यासाठी घेवून आला. दरम्यानच्या काळात प्रविण श्रीहारी जाधव याच्या वाण्यात बोलण्यात बदल जाणवत आसल्याचे नववधूच्या लक्षात आले. आपल्या नवऱ्याचे बाहेर संबध आसल्याचा संशय नववधूला आला. एका रात्री नववधूने आपल्या नवऱ्याचा मोबाईल तपासला आसता प्रविण जाधव याच्या मोबाईल वॅटसपवर सरीता नावाने जोडलेला नंबर दिसला. तसेच त्या नंबर वर धक्कादायक चॉटिंग आणी मॅसेज दिसले. त्याबात नववधुने पति प्रवीण याच्याकडे ...पान २ वर

## रक्ताचे नाते अखेर कलंकित ठरले दारुड्या मुलाला बापानेच ठार मारले



सांगली/क्राईम रिपोर्टर

मुलगा हा आई-वडिलांच्या म्हातारपणीचा आधार असतो. ज्याला कष्ट करून वाढवले त्याने भविष्यात स्वतःच्या पायावर उभे राहून सुखाचा संसार करावा आणि आई म्हणून आपलाही उतारवयात सांभाळ करावा एवढीच आपल्या मुलाकाधून आई बापाची इच्छा असते, पण मुलगा जेंव्हा व्यसनी बनून आई-बापालाच त्रास देऊ लागतो, त्यांना मारहाण करू लागतो. तेंव्हा मात्र रक्ताच्या नात्यातही रक्ताचे पाट वाहू लागतात. शेवटी अपेक्षाभंग झालेला बाप दारुड्या मुलाचा त्रास तरी किती सहन करणार आणि जेंव्हा त्याची सहनशीलता संपते. तेंव्हा मग तो टोकाचे पावूल उचलतो. मिरजे नजीकच्या कवलापूर येथेही तसेच घडले. दारुड्या मुलाला त्याच्या बापानेच एका नातेवायीकाच्या मदतीने ठार मारले. या प्रकरणी दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

मिरज तालुक्यातील कवलापूर येथे विलास बापु पवार हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. गावातच त्याची थोडीफार शेती होती. तरीही ते सांगलीला कामाला येत होते.त्याचा मुलगा विजय हा हाताखाली आला होता. त्याची पत्नी ही घर सांभाळून दुसऱ्याच्या शेतात ...पान ६ वर

02 TO 08 AUGUST 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 31/07/2021 9:59 PM Page 1



## पान १ वरून....

### गतीमंद असल्याने त्याचे लग्न नाही...

आपल्या एका मुलीचे लग्न करून दिल्याने ती दिल्या घरी तिच्या सासरी राहयला होती. घरात पत्नी पत्नी कस्तुरी आणि मुलगा प्रवीण याच्या सोबत ते राहत होते. मुलगा प्रवीण हा थोडासा गंतीमंद होता. तो आपल्याच गुंगीत राहत होता. त्याला सगळे काही समजत होते. पण त्याची बुध्दी चालत नव्हती. तो मित्रांच्या सगंतीने दारू ही पित होता. सकाळी आपल्या शेताकडे गेले की ते संध्याकाळीच तेथून परत येत होते. त्याचा २६ वर्षाचा मुलगा प्रवीण हा शेती कामात त्यांना मदत करीत नव्हता. त्यामुळे देवाप्पा हे त्याचेवर चिडत होते. तू काही तरी कामधंदा कर. चांगल्या ठिकाणी नोकरी कर. असे त्याला ते सांगत होते. पण तो काही त्याचे ऐकत नव्हता. उलट तो स्वत:च्या खर्चाला आपल्या आई वडिलाकडून सारखे पैसे मागत होता. ते तर त्याला किती वेळा पैसे देणार या कारणातून मुलगा प्रवीण आणि वडिल देवाप्पा याचेत सारखी भांडणे होत होती. अलिकडे तर प्रवीण हा आपल्या मित्रांच्या संगतीने दारू प्यायला ही लागला होता. घरात तो दारू पिऊन येऊन भांडण काढत असल्याने भांडणात वडिलांनी त्याच्या कानाखाली दोन लावल्या आहेत. याचा राग प्रवीण याला आला होता. त्या दोघातील भांडणे ही आता दररोजची होती. वडिल त्याचे उठ्ठे काढत होते. त्याला ते नाही नाही ते बोलत होते. चांगले वाग कामधंदा कर. तुझ्याबरोबरच्या मुलांची लग्ने झाली आहेत. तुझे ही लग्न आम्ही चांगली मुलगी पाहून लावून देतो. पण तू मित्राच्या नादाला लागून दारू पिऊन नकोस असा सल्ला ते देत होते. पण तो त्याचे काही ऐकत नव्हता. उलट माझे लग्न का लावून देत नाही. माझ्यासाठी मुली का पाहत नाही? म्हणून त्याचेबरोबरच वाद घालून भांडण काढून मारायला जात होता. आई वडिलांना त्याची परिस्थितीती माहित होती. तो गंतीमंद असल्याने त्याचे लग्न लावून देणे त्यांना उचीत वाटत नव्हते. म्हणून त्याने लग्नाचा विषय काढला की ते तो विषय मुद्दामच टाळत होते. ऐन तारूण्याच्या उंबरठ्यावर प्रवीण असल्याने त्याला ही त्या भावना होत्या म्हणून तो आई वडिलाच्या मागे लग्नाचा हट्ट लावत होता. आपण गतीमंद आहोत हे तो विसरला होता. त्याला फक्त आपल्या बरोबरच्या मित्रांचे लग्न झालेले आहे मग आपले का होत नाही असे वाटत होते. त्यातूनच तो त्याचेबरोबर भांडण काढत होता. त्या दोघांच्या भांडणात प्रवीणची आई कस्तुरी ही मध्यस्थी करू लागली की तिला त्या दोघांचे बोलणे ऐकून घ्यावे लागत होते. देवाप्पा तर तिला तुझ्या लाडामुळेच तो बिघडला आहे म्हणून बोल लावत होते. तिने ही बऱ्याचवेळेला देवाप्पा यांना मुलगा प्रवीण हा रागीट आणि भांडखोर आहे तुम्ही त्याला समजावून घ्या. आपण त्याचे लग्न करून देवूया म्हणजे तो सुधारेल हे सांगत होती. पर देवाप्पा हे तो अगोदर काही तरी कामधंदा करू दे मग आपण त्याच्या लग्नाचे बघू. उगाच एखाद्या चांगल्या मुलीचा गळा कापायला नको. आपलेच नाणे खोटे आहे त्याला आपण तर काय करणार असे सांगून वेळ मारून नेत होते. याचा वेगळाच प्रवीण याने काढला होता. आपले लग्न मुद्दामच आई वडिल करून देत नाहीत. आपल्यासाठी मुली पाहत नाहीत असे त्याला वाटत होते.तो आपले गुण काही सांगत नव्हता. तो आपलेच तेच खरे म्हणत आई वडिलांच्या मागे माझे लग्न लावून दया म्हणून सांगत होता. पण सध्या कोणत्याही समाजात लग्नासाठी मुली मिळणे कठीण झाले आहे याची जाणीव प्रवीण याला नव्हती. त्याला आपले आई वडिलच आपले लग्न टाळत आहेत असे वाटत होते. दारू पिऊन येून आई वडिलाच्या बरोबर भांडण काढणे एवढेच त्याला माहित होते. आता तर तो भांडणात वडिलांच्यावर हात उगारत होता. त्याचे वडिल ही तापट असल्याने त्याने हात उगारल्यावर त्याला माझ्या प्रॉप्रटीतील एक पै ही तुला देणार नाही, सगळे काही मी माझ्या मुलीच्या नावे करतो अशी धमकी त्याला देत होते. त्यामुळे तो आणखीन जास्त चिडत होता. तो गतीमंद असला तरी त्याला सगळे काही कळत होते पण काही गोष्टी वळत नव्हत्या. खर्चाला पैसे मागणे तेवढे कळत होते.घटनेच्या रात्री ही त्याने त्याचेकडे लग्नाच्या कारणातून आणि पैसे मागून भांडण काढले होते. बुधवार दि.२८ जुलै तो दारू पिऊनच रात्रीच्या वेळी घरी आला. त्यावेळी त्याने मुद्दामच वडिलाच्या बरोबर माझे लग्न का करून देत नाही म्हणून भांडण उकरून काढले होते.वडिल ही त्याला त्यावेळी तू चांगले वाग. काही तरी काम कर असे सांगत टोचून बोलत होते. याचा राग प्रवीण याला आला. तुम्ही माझी गावात आणि नातेवाईकात अब्रु काढत आहात त्यामुळे माझे लग्न होत नाही म्हणून तो त्याच्या अंगावर जावू लागल्यावर त्यांनी ही त्याला पकडून दोन चप्पलाने हाणले हे बघून तो चवताळला आणि त्याने घरातील काठी घेऊन वडिल देवाप्पा यांना मारहाण करू लागला. त्या मारहाणीत देवाप्पा हे गंभीर जखमी झाले त्यावेळी त्याची आई त्याचे भांडण सोडावयाला आली तर तिला ही त्याने त्याच काठीने मारहाण करीत मला १००० हजार रूपये दे मी आता दारू पिऊनच येणार आहे असे म्हणून पैसे मागू लागला. इकडे तर त्याने आपल्या वडिलांना काठीने मारहाण करून त्यांना गंभीर रित्या जखमी केले होते. आणि वरून १०००हजार रूपये ही मागत आहे याचा तिला ही राग आला होता. म्हणून तिने ही त्याला भांडणात दोन कानाखाली लावले त्यावेळी तो मी आता तुम्हा दोघांना ही सोडत नाही म्हणून तेथून परत गेला आणि रात्री १२ च्या दरम्यान परत आला.येताना त्याने आपल्या खिशातून एक चाकू आणला होता. तो त्यावेळी अजूनही रागाच्या भरात होता. परत येवून तो भांडण काढीत होता.त्यावेळी ही तो दारूच्या नशेतच होता. आल्या आल्या त्याने आपल्या आई वडिलाना तुम्ही मला का मारहाण केला म्हणून त्याचे अंगावर जात होता. अगोदर त्याने काठीने मारहाण केल्याने देवाप्पा हे गंभीर जखमी असल्याने ते आतील खोलीत झोपले होते. प्रवीण हा वडिलांचा राग आईवर काढत होता. तो तिला नाही नाही ते बोलत असल्याने त्या ही अवस्थेत वडिल बाहेर आले. वडिल बाहेर येताच तो पुन्हा चवताळला. तो वडिलांच्या अगांवर जात रागाच्या भरात त्याने आपल्याकडील चाकूने त्याचे पायावर पोटावर आणि मानेवर सपासप वार केले. त्या वारासरशी त्याच्या शरीरातून रक्ताच्या धारा लागल्या होत्या. हे बघून कस्तुरी यांनी त्याला बाजूला ढकलले परंतू त्या आधीच देवाप्पा हे रक्ताच्या थारोळ्यात खाली पडले होते. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. गावात खूनाची घटना घडल्याने लोक ही देवाप्पा याच्या घराजवळ जमा झाले होते. काही लोकांनी दारूच्या नशेत असलेल्या प्रवीण याला पकडून ठेवले होते. त्यातु रात्री १च्या दरम्यान या घटनेची माहिती एका नागरिकांने उमदी पोलीस स्टेशनला दिली. खूनाच्या घटनेची माहिती मिळताच उमदी पोलीस स्टेशनचे स.पो.नी दत्तात्रय कोळेकर यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची पाहणी केली. ही घटना कोणत्या कारणातून कुणी केली याची माहिती त्यांना मिळाली होती. तसेच या घटनेतील संशयीत आरोपी प्रवीण मोडे याला जमावाने पकडून ठेवले होते. पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. घटनास्थळाचा पंचनामा करून लोकांचे जाब जबाब नोंदविल्यानंतर त्याला उमदी पोलीस स्टेशनला आणण्यात आले. पंचनाम्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी उमदी येथील प्राथमिक रुग्णालयात पाठवून दिला. दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरूवारी सकाळी जत उप विभागीय पोलीस अधिकारी रत्नाकर नवले यांनी घटनास्थळाची पाहणी करून पोलीसांना तपासाच्या सुचना दिल्या. या घटनेची फिर्याद मयत देवाप्पा खिराप्पा मोडे याच्या पत्नी कस्तुरी मोडे यांनी उमदी पोलीस स्टेशनला दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी देवाप्पा खिराप्पा मोडे (वय ५५) याच्या खून प्रकरणी त्याचा मुलगा प्रवीण देवाप्पा मोडे (वय २६) याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. संशयीत आरोपी हा पोलीसांच्या ताब्यात असल्याने पोलीसाच्या समोर त्याने आपला गुन्हा कबुल केला. पोलीसांनी घटनास्थळा वरील सकृत दर्शनी पुरावे आधीच गोळा केले होते.या पुराव्याच्या अधारे पोलीसांनी त्याला जत येथील कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी प्रवीण मोडे याचे कडून गुन्हयात वापरलेला चाकू हस्तगत केला होता. या घटनेचा पुढील तपास पोलीस उप.निरीक्षक नामदेव दांडगे हे करीत आहेत.त्यांना पोलीस कॉ.विक्रम गोंदे हे मदत करत आहेत.

### विश्वासघातकी मित्रांमुळे मैत्रीचा...

तिघे मित्र सुटीच्या दिवशी एकत्र भेटून फिरायला जात. ज्ञानदानाचे कार्य करणारा संदीप हा दोघा मित्रांसोबत अनेकदा मद्यपान करण्यास बसून जात होता. शाळेत विद्यार्थ्यांना महात्मा गांधीजींचे विचार सांगणारा संदीप मित्रांसोबत मात्र मद्यपान करत होता. तिघे मित्र कधी कधी प्रसंगानुरुप एकमेकांच्या घरी देखील जात होते. शिक्षक असलेल्या संदीपची पत्नी दिसायला देखणी होती. चारचौघात तिचे तारुण्य उजळून दिसत असे. बोलायला देखील ती मनमोकळी होती. त्यामुळे पती संदीपचे मित्र म्हणून घरात आलेल्या राकेश व शरद या दोघांसोबत ती मिळून मिसळून बोलत होती. संदीप, शरद व राकेश या तिघांची मैत्री त्यांच्या घरात व गावात सर्वांना परिचीत झाली होती. त्यामुळे संदीपच्या गैरहजेरीत राकेश अथवा शरद हे दोघे आले तरी त्यांच्याबाबतीत कुणी शंका घेत नव्हते. तिघे मित्र अधूनमधून हॉटेलमधे ओली पार्टी करण्यासाठी देखील जात होते. त्यावेळी त्यांच्यात सर्व प्रकारच्या गप्पा होत असत. मात्र हळूच चोरपावलांनी या मैत्रीत शरदच्या वासनेने शिरकाव केला. शरदच्या मैत्रीत वासनेची किनार तयार झाली होती. संदीपची पत्नी दिसायला देखणी होती. तिच्या तारुण्यावर शरदची नजर खिळली होती. संदीपच्या पत्नीला भेटण्यासाठी शरद मुद्दाम त्याच्या घरी एकटाच जाऊ लागला. संदीपच्या गैरहजेरीत दिवसागणिक त्याचे जाणे येणे जरा जास्तच वाढले. शरद हा पती संदीपचा मित्र असल्यामुळे ती देखील त्याचे आदरतिथ्य करत होती. मात्र तो संदीपच्या गैरहजेरीत नेहमी नेहमी येऊ लागल्यामुळे तिच्या मनात शरदबद्दल शंका येण्यास वाव निर्माण झाला. सुरुवातीला तिने त्याच्या वागण्या-बोलण्याकडे दुर्लक्ष केले. मात्र नंतर तिला शरदच्या वागण्यात व बोलण्यात बदल जाणवला. आजूबाजूच्या महिलांच्या मनात देखील शंका निर्माण होण्यास जागा झाली होती. शरद नेहमी नेहमी संदीपच्या गैरहजेरीत का येतो? असा प्रश्न शेजारच्या महिला संदीपच्या पत्नीला विचारु लागल्या. संदीप घरी आल्यावर त्याची पत्नी त्याला सांगत असे की आज तुमचा मित्र शरद घरी येऊन गेला. त्याला काही काम नव्हते तो सहज आला होता. सुरुवातीला संदीपने देखील याकडे दुर्लक्ष केले. मात्र हा प्रकार नेहमीचा झाल्याने त्याच्या मनात देखील शंका येऊ लागली. कालांतराने शरदने लाजलज्जाच सोडली. तो केव्हाही, कधीही संदिपच्या पत्नीला भेटण्यासाठी येऊ लागला. मधल्या काळात त्याला टाळणारी संदीपची पत्नी आता मात्र शरदकडे आकर्षीत झाली. तिला त्याचे बोलणे आवडू लागले. तो केव्हाही आला तरी ती त्याचे आदरतिथ्य जोमाने करु लागली. तिला आता पती संदीप पेक्षा शरद जवळचा वाटत होता. नेहमी नेहमी घरी येणाऱ्या संदीपच्या मित्राबद्दल तिच्या मनात प्रेमाचा अंकुर फुलला. सहवासातून तिच्या मनात शरदविषयी प्रेम निर्माण झाले. दोघात घनिष्ठ संबंध निर्माण झाले. वहिनी वहिनी म्हणत त्याने तिच्यावर प्रेमाचे जाळे फेकले. त्यात ती पुरती फसली. पतीच्या मित्रासोबत वाढत जाणारा तिचा सहवास घरातील इतर सदस्यांप्रमाणे परिसरातील महिलावर्गाला देखील खटकू लागला. आपल्या गैरहजेरीत शरद घरी येतो हे संदीपला समजले होते. मात्र पत्नीप्रमाणेच मित्र असलेल्या शरदवर त्याचा विश्वास होता. त्यामुळे सुरुवातीला त्याने दोघांकडे दुर्लक्ष केले. दरम्यानच्या कालावधीत संदीपच्या पत्नीचे शरदसोबत असलेले प्रेमसंबंध चांगलेच बहरले. त्या प्रेमाला चांगला आकार आला होता. दोघांनी प्रेमात चांगलीच प्रगती केली. हा प्रकार संदीप व शरदचा तिसरा मित्र राकेशला देखील समजला. त्याने या प्रकरणी शरदला विचारणा केली. शरदने राकेशला सर्व काही सत्यकथन केले. संदीपच्या देखण्या पत्नीला शरदने आपल्या जाळ्यात चांगलेच ओढले होते. ती देखील शरदच्या जाळ्यात पुरती फसली होती. तो तिचा आनंद लुटत असल्याचे समजल्यानंतर राकेशला राग येणे अपेक्षीत होते. मात्र तसे मुळीच झाले नाही. आता शरदप्रमाणेच राकेशच्या मनात देखील वासनेचा शिरकाव झाला. आपल्याला देखील एके दिवशी शरदप्रमाणे संदीपच्या पत्नीसोबत जवळीक साधण्याची संधी मिळेल या आशेने त्याने शरदच्या कृत्याचे समर्थन केले. हा मैत्रीवर एकप्रकारे आघात होता. शरद व राकेश आतून एक झाले होते. दोघे संदीपच्या पत्नीच्या कामुकतेकडे आकर्षित झाले होते. संदिपला दारु पिण्याचे भारी व्यसन होते. संदीपच्या एका मित्राने त्याच्या पत्नीसोबत जवळीक साधली तर दुसऱ्याने त्याच्या कृत्याचे समर्थन केले होते. आपल्या पत्नीचे आपलाच मित्र म्हणवणाऱ्या शरदसोबत नको ती जवळीक असल्याचे समजताच संदीप हादरला होता. ज्या मित्रावर व ज्या पत्नीवर आपण विश्वास टाकला त्या दोघांनीच आपल्याला दगा दिल्याचे समजल्यानंतर तो मनातून दोघांवर चिडला होता. मात्र आपल्या संसाराचे हित लक्षात घेत त्याने आधी पत्नीला समजावले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे कमी प्रमाणात मद्य घेणारा संदीप आता जास्त प्रमाणात मद्यप्राशन करु लागला. त्याला दारु पाजणारे त्याचे दोघे मित्र आता एका पायावर तयार राहू लागले. ते स्वत:हून त्याला दारु पिण्याचे आमंत्रण देऊ लागले. दारु पिण्यास बोलावले म्हणजे शिक्षक संदीपची कळी खुलत असे. मात्र एकदा का त्याला दारुची नशा चढली म्हणजे तो शरदला चांगलीच शिवीगाळ करत असे. शरदची अक्षम्य चुक असल्यामुळे तो मुकाट्याने संदीपचे बोलणे ऐकून घेत होता. त्याशिवाय शरदकडे दुसरा दुसरा पर्याय नव्हता. राकेश मात्र दोघांना शांत करण्याचा नाटकी प्रयत्न करत असे. संदीप व शरद यांच्यातील वाद विकोपाला गेल्याचे स्पष्ट होते. वास्तविक तिघे एकमेकांचे मित्र होते. मात्र संदीपच्या पत्नीसोबत शरदचे संबंध उघड झाल्यापासून तो शरदचा वैरी झाला होता. राकेश देखील शरदचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष समर्थन करत असल्याचे संदीपच्या लक्षात आले होते. त्यामुळे राकेश देखील संदीपचा वैरी झाला होता. आता तर शरद समोर दिसला म्हणजे संदीपच्या तळपायाची आग मस्तकात जात होती. तो त्याला कुठेही भर रस्त्यात शिवीगाळ करण्यास मागे पुढे बघत नव्हता. संदीपकडून होणारा अवमान तो सहन करत होता. संदीप शरदला विश्वासघातकी म्हणत होता. त्यामुळे शरदला उत्तर देणे अशक्य झाले होते. मदिरा आणि मिनाक्षी या दोन घटकामुळे वाद वाढतच होता. शरदचे संदीपच्या पत्नीसोबत असलेले प्रेमसंबंध उघड झाले होते. त्यामुळे संदीपच्या पत्नीला भेटणे शरदला अवघड होऊन बसले होते. शरदच्या दृष्टीने संदीप हा त्याच्या वाटेतील अडसर होता. संदीपच्या पत्नीला शरद भेटू शकत नव्हता. संदीपला कायमचे संपवले तर हा अडसर कायमचा दूर होऊ शकतो असा विचार शरदच्या मनात चमकू लागला. याकामी शरदने राकेशची मदत घेण्याचे ठरवले. दोघांनी मिळून तसे नियोजन सुरु केले. संदीप आणि शरदचे वैयक्तीक संबंध खराब झाले असले तरी राकेश कोळीच्या मध्यस्थीने तिघेही मद्यपान करण्यास एकत्र जमत होते. मद्याच्या नशेतच तिघे जण आपापल्या घरी जात होते. तिघांचा हा कार्यक्रम प्रत्येकाच्या घरातील सदस्यांना चांगल्याप्रकारे माहिती होता. २६ जून २०२१ रोजी रात्री उशीरापर्यंत संदीप घरी आलाच नाही. त्यामुळे त्याच्या घरातील सदस्य चिंतीत झाले. सध्या संदीप मोठ्या प्रमाणात मद्याच्या आहारी गेला होता. त्यामुळे घरात सर्वांना त्याची जास्त चिंता लागली होती. सर्व जण त्याचा शोध घेतच होते. दरम्यान त्यांना सरवड शिवारातील लामकानी रस्त्यावरील सप्तशृंगीमाता मंदिराच्या प्रवशेद्वारासमोर संदीपचा मृतदेह आढळून आला. एका अज्ञात वाहनाच्या धडकेत संदीपचा अपघात झाल्याचे परिसरातील बघ्यांनी त्याच्या नातेवाईकांना सांगितले. अंधार असल्यामुळे धडक देणाऱ्या वाहनासंदर्भात कुणीही व्यवस्थीत माहिती देत नव्हते. संदीप मद्याच्या नशेत असतांना त्याला वाहनाचा धक्का लागला व त्यात तो गतप्राण झाल्याची परिसरात चर्चा सुरु होती. त्या अनुषंगाने सुयोग भानुदास बोरसे या संदीपच्या नातेवाईकाने सोनगीर पोलीस स्टेशनला अपघाताचा गुन्हा नोंद केला. त्यानंतर संदीपच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सोनगीर पोलीस स्टेशनला संदीपच्या संदर्भात अपघाताचा गुन्हा दाखल झाला असला तरी तो अपघात नसून घातपात असल्याचा संशय नातेवाईकांकडून व्यक्त केला जात होता. त्याचे कारण म्हणजे संदीप आणि शरद यांच्यातील मित्रत्वाचे संबंध पार बिघडले होते. संदीप शरदला नेहमी शिव्या देत होता. त्यामुळे शरदनेच त्याचा घातपात घडवून आणला असावा असा संदीपच्या नातेवाईकाना दाट संशय होता. त्यांनी धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक चिन्मय पंडीत, अप्पर अधीक्षक प्रशांत बच्छाव तसेच सोनगीर पोलीस स्टेशनचे स.पो.नि.प्रकाश पाटील यांना रितसर अर्ज देवून या प्रकरणी सखोल चौकशीची मागणी केली. संदीप बोरसेच्या नातेवाईकांचा पाठपुरावा बघता जिल्हा पोलीस अधीक्षक चिन्मय पंडीत यांच्या निर्देशाखाली स.पो.नि. प्रकाश पाटील यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक नामदेव सहारे, हेड कॉन्स्टेबल संदेशसिंह चव्हाण, पोलीस नाईक शिरीष अदाणे, कॉन्स्टेबल अतुल निकम, अजय सोनवणे, राम बोरसे, संजय पाटील यांच्यासह सायबर सेलच्या मदतीने तपासकामाचे नियोजन केले. स.पो.नि.प्रकाश पाटील यांच्या तपास पथकाने सरवड फाट्यापासून तर धुळे शहरातील नगावबारीपर्यत मुंबई-आग्रा महामार्गावरील हॉटेल्स आणि ढाब्याच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. या पाहणी दरम्यान तपास पथकाला धुळ्यातील नगावबारी परिसरातील हॉटेल सुरुची येथील सीसीटीव्ही फुटेजमध्ये संदीप बोरसेसोबत शरद दयाराम राठोड आणि राकेश मधुकर कोळी असे तिघे सोबत मद्यपान करतांना आढळून आले. हे तिघांनी तेथून इनोव्हा कारने प्रस्थान केल्याचे देखील निष्पत्र झाले. या फुटेजमध्ये शरद राठोडचे अस्तित्व लक्षात आले. स.पो.नि. प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने अगोदर शरद यास ताब्यात घेतले. त्याने तपास पथकाची दिशाभूल करण्यास सुरुवात केली. मात्र संदीपच्या मृतदेहाचा व त्या परिसराचा पंचनामा करतांना सापडलेला इनोव्हा कारचा लोगो आणि इनोव्हा कारच्या बंपरचा तुटलेला तुकडा आढळला होता. तो शरदला दाखवला असता शरदचे अवसान गळून पडले. त्यामुळे तो बोलता झाला. आपल्या अनैतिक संबंधातील काटा सारण्यासाठी तसेच आपल्याला वारंवार शिव्यांची लाखोली वाहणाऱ्या संदीपचे तोंड कायमस्वरुपी बंद करण्यासाठी शरदनेच नियोजन केले होते. त्या नियोजनात शरदचा साथीदार राकेशने संदीपला २६ जून २०२१ रोजी रात्रीच्या वेळी धुळ्यातील नगावबारी परिसरातील हॉटेल सुरुची येथे आमंत्रण दिले होते. मद्य पिण्यासाठी हपापलेला संदीप तातडीने येतो हे दोघांना माहिती होते. शरदकडे असलेल्या कारमध्ये बसून ते तिघे देवभाने फाट्यावर सोबत आले. सावध राहून शरद आणि राकेश या दोघांनी मिळून संदीपला येथेच्छ मद्य पिण्यास दिले. त्यानंतर त्याला वाहनात बसवले. सरवड शिवारातील लामकानी रस्त्यावर घरी जाण्यासाठी वाहनातून खाली उतरवून दिले. मद्याच्या अतिसेवनामुळे अंधारात संदीपला धड चालता येत नव्हते. त्याचवेळी पुर्वनियोजनानुसार शरदच्या सांगण्यानुसार राकेशने संदीपला इनोव्हा य वाहनाची जोरदार धडक दिली. त्या जोरदार धडकेत संदीप जमिनीवर कोसळण्यास वेळ लागला नाही. या जबर धडकेत घटनास्थळावर इनोव्हाचा लोगो आणि बंपरचा तुकडा पडला. या धडकेच्या आवाजामुळे रस्त्यावरील काही पादचारी मदतीसाठी धावत आले. दरम्यान अंधाराचा फायदा घेत इनोव्हासह दोघे पसार झाले. शरद राठोडचा जवाब पुर्ण झाल्यानंतर स.पो.नि. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचा तपासाचा ताण हलका झाला. त्याच्या जवाबाच्या आधारे शरद राठोड व राकेश कोळी या दोघांना ताब्यात घेत अटक करण्यात आली. दोघंविरुद्ध भा.द.वि. ३०२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना सुरुवातीला पोलिस कोठडी सुनावली. शरद राठोड व राकेश कोळी दोघे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

### महिलेला ठार मारून सुटकेसमध्ये ...

असेल तर मृतदेह पोलीसांच्या हाती लागता कामा नये. म्हणून आरोपी किंवा मारेकरी एखाद्याची हत्या केल्यानंतर त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावतात तरीही तो मृतदेह पोलीसांच्या हाती लागतोच. त्यानंतर पोलीस मारेकर्याविरूद्ध शोध मोहीम हाती घेऊन खऱ्या गुन्हेगाराला गजाआड करतात. असं म्हणतात की खूनाला वाचा फुटतेच. पोलिसांना मिळालेला एखादा 'क्ल्यू' नंतर पोलीस मारेकऱ्यांपर्यत पोहचतात. पालघर वसईच्या समुद्र किनाऱ्यावर ही असाच एक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे पोलीस पथक चक्रावून गेले आहे. अशा घटना वारंवार घडत असल्यामुळे पोलीसांसाठी मोठी डोकेदुखी ठरली आहे. पालघर वसई येथील समुद्रातून अनेक किंमती वस्तू वाहून किनाऱ्यावर येत असतात. वसईच्या भुईगाव समुद्रकिनारी लाटांसोबत एक सुटकेस किनाऱ्यावर धडकली. या सुटकेसमधून दुर्गंध येत होता. त्यामुळे का काहीतरी विचित्र प्रकार असल्याचा संशय स्थानिकांना आला. यावेळी तेथील स्थानिक पोलीस कर्मचाऱ्याच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी तातडीने या सुटकेस विषयीची माहिती पोलीस ठाण्यात दिली. सुटकेसची माहिती मिळाल्यानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सुटकेसमधून प्रचंड दुर्गंध येत होती, हे त्यांच्या निदर्शनास आलं. त्यांनी ती सुटकेस ताब्यात घेऊन उघडली असता त्यामध्ये महिलेचा मुंडकी नसलेला मृतदेह आढळला. सुटकेसमधील मृतदेह बघून पोलीसही हादरले. पोलिसांनी तातडीने वेळेचा विलंब न करता तो मृतदेह जेजे रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. याप्रकरणात वसई पोलीसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक २७८/२१ भा.द.वि.३०२,२०१ असा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. हि तरूणी कोण? कुठली? या तरूणीचे मारेकरी कोण? हिची हत्या का करण्यात आली? या व इतर शोध घेतला जात आहे. आम्ही लवकरच या तरूणीचा नातेवाईकांचा शोध घेऊन या तरूणीची हत्या करणाऱ्या खर्या आरोपींना गजाआड करू असे या गुन्ह्याचा तपास करणारे पोलीस निरीक्षक कर्ते यांनी क्राईम संध्याशी बोलताना सांगितले. पोलिसांच्या अंदाजानुसार, संबंधित मृतदेह हा समुद्रात भरती आली असताना टाकण्यात आला असावा. त्यानंतर आता ओहटी असल्याने मृतदेहाची सुटकेस किनाऱ्यावर आली असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मृतदेहाची ओळख पटवणं अवघड आहे. पण पोलीस त्यांच्या स्तरावर या प्रकरणाचा उलगडा करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करत आहेत. पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच तपासासाठी स्वतंत्र ४ पथक तयार करण्यात आली आहेत. दरम्यान पालघर जिल्ह्यातील कुणी तरूणी अलिकडच्या काही दिवसात बेपत्ता आहे का याचा शोध घेतला जात आहे. अनैतिक संबंधातून किंवा प्रेमप्रकरणातून या तरूणीची हत्या करण्यात आली असावी असाही अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. या मृतदेहाची ओळख पटल्याशिवाय या हत्येचा उलघडा होण्यास पोलीसांना अठचण निर्माण होणार आहे. पोलीस या मृतदेहची ओळख पटवण्यासाठी सर्व प्रसार माध्यमांचा वापर करीत आहेत. एकाच महिन्यात तीन मृतदेह वसई पोलीस ठाणे हद्दीत सापडले आहेत. दोन मृतदेह हे वसई पाचूबंदर समुद्र किनाऱ्यावर तर आज एक मृतदेह भुईगाव समुद्र किनाऱ्यावर सापडला आहे. १५ जुलैला अनोळखी पुरुषाचा मृतदेह किल्लाबंदरला सापडला होता. त्याआधी १२ जुलैला ममता पटेल या बेपत्ता असणाऱ्या महिलेचा किल्ला बंदर येथे मृतदेह सापडला होता. ममता पटेल या मॉर्निंग वॉकसाठी गेल्या होत्या आणि त्या बेपत्ता झाल्या होत्या. दुसऱ्या दिवशी त्यांचा मृतदेह सापडला होता.

### कोरोनाच्या काळातही बदल्यांचे रॅकेट ...

करतात, तेंव्हा अशा अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी या चारही जिल्ह्यातील लोक करीत आहेत. लातुरचे आरोग्य उपसंचालक डॉ.एकनाथ माले हे गत तिन वर्षापासून लातुर मध्येच उपसंचालक या पदावर आहेत यांच्याकडे लातुर बिड उस्मानाबाद नांदेड या चार जिल्याचा कार्यभार आहे. वरील चार हि जिल्यातील अरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीसाठी पात्र असणारे कर्मचाऱ्यांचे नाव यादीमध्ये असुन सुद्धा त्यांचे प्रमोशन करण्यात आलेले नाही. ज्या कर्मचाऱ्यांने अर्थिक व्यवहार केले त्याच कर्मचाऱ्यांचे प्रमोशन करण्यात आले आहे. एखाद्या कर्मचाऱ्यांचे प्रमोशन करायचे असल्यास दिड लाख ते दोन लाख रुपये देवाव लागते अशी चर्चा सर्रास पणे चालू आहे. असाच प्रकार प्रशासकीय बदलीमध्ये सुद्धा चालू आहे. उदाहरणार्थ उदगीर सारख्या ठिकाणी जागा रिक्त आसताना सुद्धा नाही म्हणून सांगणे व त्यांची जिल्हा बदली करतात. संबंधित बदली करून घेणारा कर्मचारी उदगीरला जाऊन शासकिय रुग्णालयात चौकशी केली असता त्यांना रिक्त जागा आहेत किंवा रिक्त जागा असल्याचे समजते. मग हा कर्मचारी नाइलाजाने बदलीसाठी उदगीर हे ठिकाण सोयीचे असल्याने अरोग्य उपसंचालक यांना लाखो रुपये देऊन उदगीर सारख्या ठिकाणी बदली करुन घेतो अशी चर्चा चालू आहे. हे फक्त एक कर्मचारी यांचा विषय नसुन चार जिल्हाचा कारभार हा लातुर मधुन चालत असल्याने अरोग्य उपसंचालक एकनाथ माले यांनी अरोग्य विभागात पदोन्नती व प्रशासकीय बदलीमध्ये करोडो रुपयाच्या घोटाळा करीत असल्याची चर्चा मात्र सर्रास पणे होत आहे. औरंगाबाद सारख्या ठिकाणी समुपदेशाने पदोन्नती होत आहे. तसेच या लातुर मंडळात असे झाल्यास पदोन्नती पासुन कोणीही वंचित राहणार नसल्याचे अरोग्य कर्मचाऱ्यांचे मत आहे. तसेच ३, ४ ऑगस्टला प्रशासकीय बदली प्रकरणात कान्सलींग (समुपदेशन) मिंटीग आहे. या मिंटीगला अरोग्य उपसंचालक एकनाथ माले, जिल्हा शल्य चिकित्सक लक्ष्मण देशमुख, सहायक संचालक संजय ढगे, मुख्य प्रशासकीय आधिकारी प्रंशात बडगीरे हे वरील अधिकारी असतात ज्या कर्मचाऱ्यांचे बदली मध्ये नावे आहेत. ते या तारखेला जातात आणि त्याच्या चार दिवस अगोदरच पैशाचा व्यवहार ठरलेला असतो, असे अरोग्य कर्मचारी यांच्या कडुन बोलले जात आहे. या सर्व प्राकरणाची दखल अरोग्यमंत्र्यांनी घ्यावे व या आरोग्य उपसंचालक एकनाथ मालेची संपत्तीची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात यावी. तसेच ढगे, बडगीरे, देशमुख यांची गडचिरोली सारख्या ठिकाणी बदली करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

### सात फेरे घेतले निभवण्या जन्मोजन्मीची ...

विचारणा केली असता. त्याने याबाबत काही उत्तर दिले नाही. काही दिवसानी ती सरीता नसून रमा सरोदे असून ती पोलिस दलात नोकरीला आसल्याचे नववधुला सांगितले. तसेच माझा मोबाईल का पाहिलास म्हणून प्रविण जाधव यांने नववधुला शारीरीक, मानसिक व लैंगिक छळ करण्यास सुरूवात केली. हा सारा प्रकार नववधून आपले आई-वडील व सासरकडील मंडळीनां सांगितला. दरम्यान नववधूचे सासरे श्रीहारी जाधव हे लातूर येथील पोलिस वसहातीत आले व नववधुला उस्मानाबाद तालुक्यातील चिखली या गावी घेवून गेले. दरम्यानच्या काळात पती प्रविण जाधव यांचे व रमा सरोदे यांचा कोर्ट मॅरेज झाले आसल्याचे नववधूला कळाले. त्यावेळी सासरकडील मंडळीने या प्रकरणाची बाहेर वाच्यता केल्यास नववधुला व तिच्या कुटूबियांना जिवे मारण्याची धमकी दिली. काही दिवसत चिखली येथे राहून नववधू आपल्या माहेरी आली. दरम्यान सासरकडील मंडळीने विवाहीतीची समजूत काढून तिला लातूर येथे पोलिस वसहातीत आणले. दरम्यानच्या काळात नववधूची इच्छा नसताना प्रविण जाधव याने बळजबरीने लैंगिक संबध सुरू ठेवले.

नवऱ्याकडून वरंवार होत आसलेल्या छळाला कंटाळून नववधूने पोलिस ठाण्यात धाव घेवून रितसर तक्रार दाखल केली. तक्रारीत सासु५ सासरे, दिर, व प्रविण याची पत्नी रमा या सर्वांनी संगणमत करून माझी व माझ्या वडीलांची आर्थीक फसवणुक केली आसल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी पिडीतीने दिलेल्या फिर्यादिवरून लातूर शहरातील विवेकानंद पोलिस ठाण्यात आरोपी प्रविण श्रीहरी जाधव, श्रीहारी भानूदास जाधव, संगीता श्रीहारी जाधव, प्रशांत श्रीहारी जाधव, रमा उध्दवराव सरोदे याच्यावर गुरनं ४७७/२०२१ कलम ३७६(२)(एन), ४२०,४९३, ४९५,४९६, ५०६,३४, भा.दं.संहिता प्रमाणे विवेकानंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी प्रविण जाधव याला पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास विवेकानंद पोलिस ठाण्याचे करीत आहेत.

क्राईम संध्या | सोमवार दि. २ ऑगस्ट २०२१ ते रविवार दि. ८ ऑगस्ट २०२१ | लातूर/पालघर/सोलापूर/जाहिरात | www.crimesandhya.com | ३

# सोलापूर पोलिसांनी चोरून चालणाऱ्या अवैध गावठी देशी दारूच्या हातभट्ट्या केल्या उद्ध्वस्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेच्या हद्दीत चोरून चालणाऱ्या अवैध दारूचे व्यवसाय करणाऱ्या इसमा विरूध्द दिनांक २२ जुलै ते २७ जुलै या कालावधीत विशेष मोहिम राबवुन कारवाई करणे बाबत सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, सोलापूर ग्रामीण यांनी आदेशीत केले आहे.





त्या अनुषंगाने सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या हद्दीतील मौजे गुळवंची व मुळेगाव या परिसरात चोरून चालणाऱ्या अवैध हातभट्टी दारूच्या भट्ट्या उद्ध्वस्त करण्याच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते , अप्पर पोलीस अधीक्षक, अतुल झेंडे व पोलीस उपविभागीय अधिकारी प्रभाकर शिंदे सोलापूर उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अरूण फुगे यांचे नेतृत्वाखाली विशेष मोहिम राबवुन पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी अवैध हातभट्टी दारूच्या भट्ट्यावर छापे टाकुन कारवाई करण्यात आली आहे. अवैध देशी दारूच्या हातभट्ट्यावर तसेच हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या इसमा विरूध्दच्या टाकलेल्या छापा कारवाईत एकूण ९ लाख ७६ हजार ४०० रूपये किंमतीचा मुद्देमाल त्यामध्ये ४६ हजार ४०० लिटर गुळमिश्रीत रसायन त्यामध्ये १९८ प्लॅस्टीक व ७ लोखंडी बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावठी हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य, अवैध दारूच्या हातभट्ट्या जागेवरच उध्द्वस्त करून प्लॅस्टीक/लोखंडी बॅरेल जागीच फोडुन गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट केल्या आहेत. अवैध दारूच्या हातभट्ट्या उध्द्वस्त केलेल्या ठिकाणी एकूण ९ इसमा विरूध्द तसेच अवैध हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या ३ इसमा विरूध्द गुन्हे दाखल करून त्याचेकडुन ४५ लिटर हातभट्टी दारू व अवैध गावंठी भट्टीच्या ठिकाणाहुन ५० लिटर हातभट्टी दारू अशी एकूण ९५ लिटर हातभट्टी दारू हस्तगत करून नमूद एकूण १२ इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर दाखल गुन्हयाच्या तपास सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार यांचेकडुन होत आहे.

यापुढेही सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या हद्दीतील अवैधरित्या दारूच्या व्यवसाय करणाऱ्या इसमाची माहिती संकलित करून त्यांचे विरूध्द कारवाई करण्यात येणार असल्याचे सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरूण फुगे यांनी सांगितले आहे. सदरची छापा कारवाई सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, सोलापूर ग्रामीण, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, सोलापूर ग्रामीण व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिंदे, सोलापूर उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अरूण फुगे यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर व पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पोलीस अंमलदार व महिला अंमलदार यांनी बजावली आहे.

## पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात कारगिल दिवस साजरा

**पालघर/प्रतिनिधी**



जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात आज रोजी २६ जुलै रोजी कारगिल दिवस साजरा करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी दिपप्रज्वलन करुन कार्यकमाची सुरुवात केली त्यांनतर कारगिल शौर्य योद्धास पुष्प अपर्न करुन आदराजंली वाहिली यावेळी निवासी उपजिल्हाधिकरी डॉ. किरण महाजन, माजी सैनिक भाऊराव तायडे, सुरेश आवटे, भगवान सोरठी, सैनिक ठाणे जिल्हा माजी सैनिक हितकरी संस्था पालघर, संस्थेचे सर्व पदाधिकरी व सैनिक फेडरेशन चे पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवाहन केले की जिल्ह्यातील सर्व माजी व आजी सैनिकाच्या परिवरासाठी लसीकरण करणासाठी एक विशेष शिबीर घेण्यात येणार असून कोणीही त्यापासून वंचित राहणार नाही सर्वाचे लसीकरण पुर्ण करण्यात येईल असे जिल्हाधिकारी गुरसळ यांनी सांगितले. ठाणे माजी सैनिक हितकरी संस्थाचे अध्यक्ष माजी सैनिक भाऊराव तायडे, यांनी कारगिल दिवसाच्या बाबत आपले मनोगत व्यक्त केले.

## हिरेमठ संस्थानचा शिवनाम सप्ताह उत्साहात

**औसा/प्रतिनिधी**



औसा येथील वीरशैव समाजाचे लिंगैक्य गुरु निरंजन शिवाचार्य महाराज यांनी ७० वर्षे चालविलेल्या आषाढ मासी वार्षिक उत्सवातील शिवनाम सप्ताहाची परंपरा आजतागायत सुरू आहे. ष ब्र डॉ श्री १०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थांनचे पीठाधीपती ष ब्र श्री १०८ निरंजन शिवाचार्य महाराज यांच्या अधिपत्याखाली अखंड शिवनाम सप्ताह दि.२९ जुलै २०२१ पासून सुरू झाला आहे. सप्ताह कालावधीत नित्य महारुद्राभिषेक, शिवपाठ, सिद्धांत शिखामणी तत्त्वामृत ग्रंथाचे पारायण, शिवभजन, शिवकीर्तन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हिरेमठ संस्थानच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमा सोबतच अध्यात्म ज्ञानाची शिकवण दिली जाते, वीरशैवाचे अध्यात्मिक शक्ती केंद्र म्हणून संस्थानची ओळख निर्माण झाली आहे. आषाढ मासी वार्षिक उत्सवानिमित्त प्रतिवर्षी होणारा शिवदीक्षा सोहळा दि. ४ ऑगस्ट २०२१ रोजी कोरोना संकटामुळे कोरोना नियमांचे पालन करून साजरा करण्यात येणार आहे. शिवदीक्षा सोहळ्यानिमित्त नागणसूर, होटगी, जिंतूर येथील मठाचे शिवाचार्य भाविक भक्तांना आशीर्वाचणाच्या माध्यमातून संबोधित करणार आहेत. दि. ५ ऑगस्ट २०२१ रोजी महाप्रसादाने शिवनाम सप्ताहाची सांगता होणार आहे, तरी भाविक भक्तांनी कोरोना नियमाचे पालन करून कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन वीरशैव समाजाचे अध्यक्ष सुभाषअप्पा मुक्ता, प्रा. युवराज हलकुडे, सिद्रामप्पा मिटकरी, राजाभाऊ नागराळे यांनी केले आहे.

## महाराष्ट्रात लसीचे दोन्ही डोस घेतलेल्यांची संख्या एक कोटींवर

**मुंबई/प्रतिनिधी**

कोरोना विरुद्धच्या लढाईत महाराष्ट्रात एक कोटीहून अधिक नागरिकांना लसीचे दोन्ही डोस देऊन त्यांना संपूर्ण संरक्षण देण्यात आले असून संपूर्ण देशात एक कोटीहून अधिक नागरिकांना लसीचे दोन्ही डोस देण्याचा विक्रम महाराष्ट्राने आज स्वत:च्या नावावर नोंदविला. दोन्ही डोस देऊन एक कोटीहून अधिक नागरिकांचे कोरोनापासून संरक्षण करण्याकामी आरोग्य विभागाने केलेल्या प्रयत्नांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी कौतुक केले आहे. सायंकाळी चार वाजेपर्यंत राज्यात दिवसभरात सुमारे पावणेचार लाख नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून दोन्ही डोस देण्यात आलेल्या नागरिकांची संख्या एक कोटी ६४ हजार ३०८ एवढी झाली आहे. लसीकरणामध्ये नवनवीन विक्रम महाराष्ट्राच्या नावावर नोंदविले जात आहे. आतापर्यंत राज्यातील तीन कोटी १६ लाख ९ हजार २२७ नागरिकांना लसीचा पहिला डोस देण्यात आला आहे तर आज सुरु असलेल्या लसीकरणामुळे दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकांच्या संख्येचा एक कोटीचा टप्पा पार झाला, असे आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.प्रदीप व्यास यांनी सांगितले. राज्यात आज सुमारे ४१०० लसीकरण केंद्र सुरु असून त्याद्वारे सायंकाळी ४ वाजेपर्यंत तीन लाख ७५ हजार ९७४ नागरिकांचे लसीकरण झाले, असे डॉ.व्यास यांनी सांगितले.

## अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे त्वरित पंचनामे करा- भाजपा

**वाडा/प्रतिनिधी**



तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाल्याने भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी वाडा तालुका भाजपच्या कृषी आघाडीने तहसीलदारांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. मागील आठवडाभरापासून वाडा तालुक्यात संततधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात पूरस्थिती निर्माण झाली होती. पूराच्या पाण्यात मोठ्याप्रमाणावर भातशेती पाण्याखाली गेली होती. तर पूराच्या पाण्यासोबत माती, दगड वाहून आल्या लावणी केलेल्या रोपांचे नुकसान झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून तातडीने नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देण्याची गरज आहे. याकरिता प्रशासनाने नुकसानग्रस्त भातशेतीचे पंचनामे करण्याची मागणी वाडा तालुका भाजपच्या कृषी आघाडीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात केली आहे. तसेच तालुका कृषी अधिकाऱ्यांनाही निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपचे तालुका सरचिटणीस रोहन पाटील, राजू रिकामे, उत्तम पाटील, शरद पाटील हे उपस्थित होते.

### गर्भपाताच्या औषधांची प्रिस्क्रीप्शनशिवाय विक्री प्रकरणी

## अन्न व औषध प्रशासनाची ॲमेझॉन व फ्लिपकार्टला नोटीस

**मुंबई/प्रतिनिधी**

गर्भपाताकरीता वापरात येणाऱ्या औषधाची Medical Termination of Pregnancy Kit (MTP) KIT) ऑनलाईन विक्री होत असल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन, म.राज्य यांच्यावतीने तपासणीकरिता विशेष मोहिम राबविण्यात आली. प्रशासनाने एकूण ३४ ऑनलाईन संकेतस्थळावर गर्भपातासाठी लागणाऱ्या औषधांच्या उपलब्धतेबाबत पडताळणी केली. त्यानुसार ॲमेझॉन या संकेतस्थळावर प्रशासनातील अधिकाऱ्यांनी ग्राहक म्हणून मागणी नोंदविली.

त्यानुसार डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गर्भपाताच्या औषधाची मागणी दोन वेळा ॲमेझॉनवर स्विकारून त्याची गुरुनानक इंटरप्राइजेस, लखनऊ, उत्तर प्रदेश व चौधरी फार्मास्युटिकल्स, पिरामल लि., कोरापूर, ओरिसा या संस्थेकडून औषधे पुरविण्यात आले. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय MTP kit औषधाची ऑनलाईन विक्री करणे हे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० मधील तरतुदींचे उल्लंघन आहे. प्रशासनाने ॲमेझॉन व संबंधित वितरक यांना यासंदर्भात नोटीस बजावली असून पुढील कारवाई करण्यात येत आहे. दुसऱ्या एका प्रकरणात फ्लिपकार्ट या ऑनलाईन संकेतस्थळावर गर्भपातासाठी लागणाऱ्या औषधाची मागणी नोंदविली असता डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनची मागणी न करता फ्लिपकार्टच्या संकेतस्थळावर दोनवेळा औषधाची मागणी स्विकारण्यात आली व ते पुरविण्यात येणार असल्याचे देखिल संकेतस्थळावरुन एसएमएस संदेशद्वारे कळविण्यात आले. वास्तविक गर्भपातासाठी वापरात येणाऱ्या औषधांची डॉक्टर प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्रीस होकार दर्शविणे, हे देखिल कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणारे असल्याने फ्लिपकार्ट या कंपनीस नोटीस बजाविण्यात आली असून पुढील कारवाई करण्यात येत आहे. नुकतेच पुणे येथे ॲमेझॉन या संकेतस्थळावरुन MTP Kit ची विक्री पुण्यातील औषध विक्रेत्यास केल्याने औषध विक्रेत्याने पुणे येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयास तकार दाखल केली होती. या तक्रारी अनुषंगाने प्रशासनाने तातडीने कारवाई करुन यामध्ये सामील असलेला पुरवठादार, मे. आर. के. मेडिकल, अहमदाबाद, गुजरात यांचेकडे प्रत्यक्ष जावून चौकशी केली. या वितरकाकडे औषधाचे खरेदी बिल नसल्याचे उडकीस आले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून संबंधिताविरुध्द पुणे पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

**Change of Name**
Old name: Sakira
New name : Shakira parveen
Jamil Akhtar Siddiqui
Ad. Nalasopra (w.)

## थोडक्यात वृत्तांत

### आज ऑनलाईन जिल्हास्तरीय लोकशाही दिन

पालघर : मा. सह सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२३/११/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये लोकशाही दिनाचे आयोजन परिस्थितीनुरुप करण्यासाठी जिल्हाधिकारी सक्षम असल्याबाबत सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने माहे ऑगस्टचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ०२/०८/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली Google Meet व्दारे आयोजित करण्यात येणार आहे. तरी https://meet.google.com/axh-duai-zcd ही Google Meet ची लिंक असून सदर लिंकचा वापर करून लोकशाही दिनास आवश्यक त्या माहितीसह उक्त दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

### सुशीलाबाई कन्नाडे यांचे दु:खद निधन



देवणी : देवणी तालुक्यातील बटणपुर येथील सुशीलाबाई शांतवीर स्वामी कन्नाडे वय ६० वर्ष यांचे शुक्रवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर शनिवारी सकाळी आकरा वाजता बटणपुर येथे अत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तिन मुले, सुना नातवंडे असा परीवार असुन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचीव मनोज कन्नाडे यांच्या ते आई होतत्यांच्या अकस्मीत निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### भाजप शहर जिल्हा उपाध्यक्षपदी दिगंबर माने

लातूर : भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यकारिणीच्या मेळाव्याचे राजानारायणलाल लाहोटी स्कूल येथे आयोजीत करण्यात आले होते. यावेळी जिल्हयातील कार्यकारिणी सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. लातूर येथील सामाजीक कार्यकर्ते दगंबर भाऊराव माने यांची यावेळी लातूर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली त्यांना लातूर शहर जिल्हा अध्यक्ष गुरूनाथ मगे यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मनीष बंडेवार (जिल्हा सरचिटणीस), शैलेश लाहोटी (प्रदेश कार्यकारिणी सदस्य), शैलेश गोजमगुंडे (मनपा गटनेते), देविदास काळे (माजी उपमहापौर), प्रेरणा होनराव (पक्ष प्रवक्या), अजीत पाटील कव्हेकर(जिल्हाध्यक्ष भाजपा युवामोर्चा),स्वातीताई जाधव(महाराष्ट्र प्रदेश महिला कार्यकारिणी उपाध्यक्षा), प्रवीण सावंत, दिग्वीजय काथवटे (जिल्हा सरचिटणीस) आदिंची प्रमुख उपस्थिती होती. माने यांच्या निवडबद्दल श्रीराम कुलकर्णी (जिल्हा उपाध्यक्ष), भगवंत कुलकर्णी, सुरेशजी पेन्सलवार (भाग्यलक्ष्मी बँक सल्लागार), रत्नाकर मोकासे, प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, विशाल हवापाटील, सतीष ठाकूर, गजानन चौधरी, अनंत पाटील, सुभाष कांबळे, राजाराम साखरे, डॉ. सुदाम देसाई, बालाजी व्हतांळे सरपंच, ज्ञानेश्वर हिंगे, संजय देशपांडे, सी.एम. अग्रवाल, हावन्ना साहेब, शेख शकूर, व्यंकटराव उंदरे, राजन दिक्षीत, ॲड.अनंत दूरे, पांडूरंग राजकुंवर आदिनी त्यांच्या भाजपा शहर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### वैधता प्रमाणपत्राअभावी हात्तग्याच्या सरपंच अपात्र

लातूर : ठरवून दिलेल्या वेळेत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने निलंगा तालुक्यातील हात्तरगा हा. येथील महिला सरपंच भाग्यश्री बोटले यांचे सरपंचपद व ग्रामपंचायत सदस्यत्वही जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी रद्द केले आहे. निलंगा तालुक्यातील हात्तरगा येथून भाग्यश्री रामकृष्ण बोटले यांनी ग्रामपंचायत निवडणूक लढविली होती. त्यावेळी बोटले यांनी आवश्यक असलेले जात वैधता प्रमाणपत्र सोबत न जोडता प्रमाणपत्र काढण्यासाठी दाखल केलेली पोहोच पावती जोडली होती. दरम्यान, त्या विजयी झाल्या. आरक्षणानुसार त्या सरपंचही झाल्या. परंतु, त्यांनी सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाही. यामुळे गावातीलच मधुकर विठ्ठल इंगळे यांनी बोटले यांचे सदस्यत्व व सरपंचपद रद्द करण्याची मागणी जिल्हाधिकार्यांकडे केली. याप्रकरणी दोघांचे युक्तिवाद झाले.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**
**ई-निविदा सूचना क्रमांक -०९ सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर शासकीय विश्रामगृह आवार, जुना मनोर रस्ता, वेवुर रोड, पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०३ (तीन) कामे समाविष्ट आहे.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | डहाणू तालुक्यातील उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, डहाणू यांच्या कार्यालयातील पहिल्या मजल्यावर कंडेन्सर, मायक्रोफोन सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली बसविणे. विद्युतीकरण करणे व सभागृहाच्या सिलिंगचे दुरुस्ती करणे. ता. डहाणू, जि. पालघर (प्रत्यक्षात सभागृहाच्या सिलिंगचे दुरुस्ती करणे.) | १२,६८,६८०/- | २२२५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना |
| २. | डहाणू तालुक्यातील उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, डहाणू यांच्या निवासस्थान आवारात दोन शौचालयाचे बांधकाम करणे. सर्व्हंट क्वॉर्टर दुरुस्ती करणे. निवासस्थानाच्या मागील बाजूस पेव्हर ब्लॉक बसविणे. ता. डहाणू, जि. पालघर | १५,०२,२३४/- | २२२५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना |
| ३. | वसई येथील न्यायाधीश निवासस्थाने, न्यायालयीन इमारती (नवीन व जूनी) दुरुस्तीचे काम करणे. तसेच न्यायालयीन इमारतीमध्ये असुरक्षित साक्षीदार केंद्र उभारणे व इतर अनुषंगीक बाबी. ता. वसई, जि. पालघर | ३४,९०,६२७/- | १४वा वित्तआयोग (Redesigning of Court Complexes) |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. ०२/०८/२०२१ ते दि. १६/०८/२०२१ पर्यंत
ई-निविदा उघडणे - दि. २०/०८/२०२१ दुपारी ३.०० नंतर शक्य झाल्यास

**स्थळप्रस्त का.अ.यांनी मंजूर केली आहे.**
जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/३५४३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
शासकीय विश्रामगृह आवार,
जुना मनोर रस्ता, वेवुर रोड,
पालघर (पुर्व) - ४०१ ४०४.
दिनांक : २६/०७/२०२१

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर
*करिता*

**विमाका/कोवि/२०२१-२०२२/९३**

02 TO 08 AUGUST 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 31/07/2021 10:03 PM Page 1



# मदतीची प्रतीक्षा!

महाराष्ट्रावर कोसळलेले आस्मानी संकट हे किती भीषण आहे याची प्रतीक्षा त्या त्या आपत्तीग्रस्त भागांचा दौरा करणाऱ्या नेत्यांना आली असेल. एकीकडे कोरोनाचे संकट झेलणाऱ्या ग्रामीण जनतेला या आस्मानी संकटाने पार उध्वस्त करून टाकले आहे. पाऊस काही प्रमाणात थांबलाय पण अजून कित्येक भागातले पाणी ओसरले नाही. तर ज्या भागातले पाणी ओसरले आहे तिथे आता लोकांना चिखल उपसवा लागत आहेत. चिपळूण, शिराळा, राजापूर यासारख्या सखल भागातील बाजारपेठांमध्ये जे पाणी शिरले त्याने दुकानातल्या सर्व मालाची नासाडी करून टाकली. बँकांचे, सावकारांचे कर्ज काढून दुकानदारांनी समान भरले होते. अगोदरच लॉकडाऊनच्या काळात सर्वाधिक फटका दुकानदारांना बसला होता आणि आता कुठे थोडेफार सावरत असताना अतिवृष्टीने होत्याचे नव्हते करून टाकले. सध्या पूर ओसरल्याने दुकानदार दुकानात साचलेला चिखल काढण्याच्या कामात गुंतले आहेत. तर रोज कुठल्या ना कुठल्या पक्षाचे लोक पाहणीसाठी येवून जात आहेत. मात्र मदतीबाबत कुणीच काही बोलायला तयार नाहीत. सरकारने देऊ केलेली दहा हजार रुपयांची प्रथमिक मदत म्हणजे पुरग्रस्तांची एक प्रकारे थट्टाच म्हणावी लागेल! जे लोक पुराच्या विळख्यात अडकून आठ आठ दिवस उपाशी राहिले त्यांनी या दहा हजारांत काय करायचे! अहो दहा हजार रुपये पुढाऱ्यांना दारूला पुरत नाहीत. अशा वेळी दहा हजारात सर्व सामान्य माणसांनी पोरा बाळांना कसे जगवायचे. आता म्हणे पंचनामे झाल्यावर मदतीची घोषणा करणार? पण पंचनामे होणार कधी? प्रशासनाचे काम हे कासवाच्या गतीने चालते आणि या कासवाला जोवर लाच मिळत नाही तोवर ते जागचे हलत नाही हा आजवरचा इतिहास आहे. मागील वेळी पश्चिम महाराष्ट्रात जी अतिवृष्टी झाली त्यावेळी तलाठी लोकांनी पंचनामे करण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैसे उकळले होते. आताही तसेच होणार? ज्यांच्याकडे पैसा असेल त्यांच्या नुकसानीचे पंचनामे लवकर होतील, पण जो गरीब शेतकरी किंवा शेतमजूर असेल त्याचे पंचनामे लवकर होणारच नाहीत. त्यामुळे मदत मिळेपर्यंत तो जिवंत राहणे कठीण आहे. नैसर्गिक आपत्तीत माणूस मानसिक दृष्ट्याही विकलांग झालेला असतो. कारण निसर्गाने त्याचे जे काही होते ते त्याच्या डोळ्या देखत हिस्कावलेले असते, तर दुसरीकडे सरकारकडून तात्काळ मदत सुद्धा मिळत नाही. दौऱ्यावर येणाऱ्या नेत्यांची तोंडे बघून किंवा त्यांनी दिलेल्या आश्वासनांनी लोकांचे पोट भरत नाही. तर त्यांना तात्काळ मदतीची गरज असते. पण आजकाल मदती मध्येही राजकारण आड येत असते. केंद्र आणि राज्य सरकार याबाबत एकमेकांकडे बोट दाखवत असतात. आताही केंद्राने ७०० कोटींची मदत जाहीर केली आहे. तर महाराष्ट्र सरकार पंचनामे होण्याची वाट बघत आहे. यंदा अतिवृष्टीने अर्ध्या महाराष्ट्राला बुडवले आहे. आणि एवढ्या सगळ्या जिल्ह्यांमधील पंचनामे पूर्ण करण्यासाठी बराच काळ लागू शकतो, तोवर पुरात सार काही गमावलेल्यांनी काय करायचे? आणि म्हणूनच नैसर्गिक आपतित जे नुकसान होते त्या नुकसानग्रस्तांना दिल्या जाणाऱ्या मदतीचे निकष बदलणे गरजेचे आहे. ठीक आहे तुम्ही पंचनामे झाल्यावर मदत जाहीर करा पण जी प्राथमिक मदत आहे तिची तरी रक्कम वाढवून द्या! सुरवातीला १० हजार रुपयांऐवजी जर २५ हजाराची प्राथमिक मदत मिळाली तर पूरग्रस्तांना खऱ्या अर्थाने थोडासा दिलासा मिळेल. आणि म्हणूनच अशा नैसर्गिक आपत्तीत आता मदतीचे निकष बदलण्याची आवश्यकता आहे. सरकारने जारी याकडे लक्ष दिले नाही तरी विरोधी पक्षाने याबाबत पुढाकार घेऊन २५ हजार रुपये प्राथमिक मदत द्यायला सरकारला भाग पडायला हवे. कारण पूरग्रस्त भागाचा विरोधी पक्ष नेत्यांनीही दौरे केलेल्याचे आणि तिथली भयानक स्थिती पाहिलेली आहे. तेंव्हा डोळे असून आंधळेपणाचे सोंग घेऊ नका अशा नैसर्गिक आपत्तीतून लोकांना सावरायची जबाबदारी केवळ सरकारचीच नाही, तर विरोधी पक्षाची सुधा आहे याचे विरोधी पक्षाने भान ठेवावे!

# बॉलिवूडचा डर्टी चेहरा!



**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

व्यवसाय मग तो कुठलाही असो, त्यातून जर समाजाची हानी होत असेल तर तो त्यावर तात्काळ बंदी घालायची हवी. पण आपल्या देशात असे कितीतरी व्यवसाय आहेत जे लोकांचे आरोग्य बिघडवत असतात. त्यांचं जीवन उद्ध्वस्त करीत असतात. सरकारचा महसूल बुडवून सरकारला चुना लावत असतात, तरी सुद्धा हे व्यवसाय व बिन बोभांटपणे सुरू आहेत. अशापैकीच एक आहे पोर्न बिजनेस! जगातल्या सगळ्या उद्योगांपैकी हा सर्वात जास्त नफा मिळवून देणारा व्यवसाय आहे. कारण जो दिखता है वोही बिकता है! म्हणूनच जगभरातले अनेक प्रतिष्ठित लोक या व्यवसायाशी जोडले गेले आहेत. शिल्पा शेट्टी हीचा पती राज कुंद्रा याच्या अटकेनंतर भारतातील पोर्न इंडस्ट्री आणि त्यातील काळे कारनामे लोकांसमोर आले. राज कुंद्रा पोर्न फिल्म बनवायचा. त्यासाठी त्याने राज हॉटशॉट आणि बेनिफेम अशी दोन एप्लिकेशन्स लॉन्च केली होती आणि त्यावरून पोर्न फिल्मचा हा पिवळा बाजार त्याने भरवला होता व त्यातून त्याने वर्षभरात २० कोटी रुपये कमावले अशी माहिती तपास यंत्रनांच्या हाती आलीय. पण प्रत्यक्ष हा आकडा आणखी मोठा असू शकतो. सध्या अटकेत असलेल्या राज कुंद्रा व त्याच्या साथीदारांची पोलिसांकडून चौकशी सुरू असून या सेक्स रॅकेटमध्ये बॉलिवूड मधील आणखी काही प्रतिष्ठित लोक अडकले असण्याची शक्यता आहे. कारण राजच्या पॉर्न फिल्ममध्ये बॉलिवूड मधील काही ललना होत्या असेही समजते. वास्तविक सरकारने यापूर्वीच या विषयाकडे लक्ष द्यायला हवे होते. कारण हे पिवळे विष दारू आणि अमली पदार्थांपेक्षा भयंकर असून ते आता तरुण पिढीच्या नसानसात भिणू लागले आहे. पॉर्न इंडस्ट्रीची व्याप्ती समुद्रा प्रमाणे खूप मोठी आहे आणि राज कुंद्रा हा त्यातील एक छोटासा मासा आहे. त्यामुळे जर या पोर्न इंडस्ट्रीवर कठोर कारवाई व्हावी असे जर सरकारला खरोखरच वाटत असेल तर त्यांनी तपासाची दिशा दक्षिणेकडे वळवावी. कारण पोर्न सिनेमाची सुरुवात दाक्षिणात्य चित्रपट सृष्टी मधून झाली आहे. मल्याळम भाषेत बनणारे जवळपास ८० टक्के चित्रपट हे अश्लील असतात. या चित्रपटात मोठ्या प्रमाणावर बेड सीन, बाथरूम सिन शूट केले जातात. मात्र सेन्सॉर बोर्डाकडून जेंव्हा सिनेमाची प्रिंट पाठवली जाते तेंव्हा त्यात कोणताही अश्लील सिन नसतो, पण तिथून जेंव्हा सिनेमा पास होऊन येतो आणि त्याला सेन्सॉर बोर्डाचे ए किंवा यू सर्टिफिकेट मिळते, तेंव्हा चित्रपट प्रकाशित करताना अगोदर चित्रित केलेले हॉट सिन त्याला जोडले जातात आणि हे हॉट सिन पाहण्यासाठीच लोक चित्रपटगृहात गर्दी करतात आणि बॉक्स ऑफिसवर सिनेमा सुपरहिट ठरतो. केरळ सरकारला तिथल्या पोलिसांना हे सगळ ठाऊक असूनही ते कारवाई करीत नाहीत. त्यामुळेच कुंवारी दुल्हन, अग्नी पुष्पम, लव्ह अँड सेक्स रथी निरुवेदंम आय्याम, मकर मंजू या सारखे हॉट चित्रपट तयार झाले. या सिनेमांमध्ये एकापेक्षा एक बेड सिन आणि अन् सेन्सॉर सिन आहेत. यातील कुवारी दुल्हन आणि अग्नी पुषपम हे दोन चित्रपट तर डबल एक्स ब्ल्यू फिल्म आहेत. मात्र तरी सुद्धा या सिनेमांवर कारवाई झाली नाही. सिनेमा गृहात लाखो लोकांनी हा सिनेमा पुन्हा पुन्हा पहिला. यात शाळकरी मुलांपासून काठी टेकत चालणाऱ्या आजोबापर्यंत सर्व वयोगटातील प्रेक्षकांचा समावेश होता. मग असे चित्रपट जर खुलेआम थिएटरमध्ये दाखवले जाऊ लागले, तर लोक का नाही बिघडणार? केवळ पोर्न साईटवर बंदी घालून किंवा राज कुंद्रा सारख्याला अटक करून अश्लीलतेचा हा बाजार उठणार नाही तर असे चित्रपट बनवणारे इतर निर्माते आणि त्यांच्या सोबत काम करणाऱ्या देविका, रोशनी, सनी लियोन, अमला पॉल, श्वेता मेनन यांच्या सारख्या सर्व काही दाखवायला तयार असणाऱ्या सी ग्रेड अभिनेत्री आणि मॉडेल यांच्यावरही कारवाई व्हायला हवी. या सगळ्यांची जर चौकशी केली. राज कुंद्रा या सर्वासमोर काहीच नाही असे म्हणण्याची पाळी पोलिसांवर येईल. सध्या समाज इतका बिघडलंय की लोकांना अशाच विषयात इंटरेस्ट आहे. त्यामुळे मागणी तसा पुरवठा या हिशोबाने पोर्न इंडस्ट्रीचा धंदा होतोय. आता कुठे गेले ते समाज सुधारक ज्यांनी फायर आणि बॅंडेड क्वीन सारख्या वास्तववादी सिनेमांना विरोध केला होता. सेक्स आणि त्यातून निर्माण झालेला व्यभिचार जोवर थांबत नाही तोवर राज कुंद्रा सारखे लोक डर्टी सिनेमा बनवतच राहतील. तेंव्हा त्यांना नाकरायच की स्वीकारायचं हे समाजाने ठरवायचे आहे.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**



# अण्णाभाऊ साठे लोककलेचे जनक!

रेडिओ जॉकी मालकीच्या मुंबई गाण्यांनी धमाल उडवून दिली. एकेकाळी सामाजिक व राजकीय गुण यावर नेमके बोट ठेवण्याचे काम प्रामुख्याने लोकनाट्य, मुक्तनाट्य करीत असत... माकडाला चली भान, आंधळ दळतंय, फूट पायरीचा सम्राट, कशी काय वाट चुकला, बापाचा बाप, शेटजीचं इलेक्शन, पुढारी पाहिजे, कथा अकलेच्या कांद्याची, या अशा अनेक प्रहसने मुक्तनाट्य, लोकनाट्यांनी इतिहास घडविला.... सहकार चळवळीतील दोष, मराठी माणसाची अस्मिता, राजकीय नेत्यांचा दंभ अशा विविध विषयावरील लोकनाट्य त्याकाळी बनवलेली असायची... काळ बदलला आहे एकेकाळी लोकनाट्य दंभस्फोट करायची ते काम आता रेडिओ जॅकी करू लागली आहे. एक आर्थी जागतिकीकरणाच्या लाटेत ही लोकप्रिय महिला लोककलावंत म्हटली पाहिजे यातला विनोदाचा भाग सोडला तरी दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या प्रश्नांना उपहासात्मक लेखणीतून आणि सादरीकरणातून मोकळी वाट करून देण्याचे काम आता रेडिओ करते. पूर्वी लोकशाहीरांनी हेच काम केले.त्यांचाच वारसा घेवून अण्णाभाऊ साठे यांच्या सारख्या व्यक्तीमत्वाने साहित्य लेखनीतून समाजातील विविध सामाजीक पैलूवर प्रकाश टाकून उपेक्षीतांच्या भावना व्यक्त करताना त्यांना न्याय मिळवून देण्याचे मोलाचे कार्य केले.

> **अण्णा भाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी एका अस्पृश्य समाजातील मातंग जातीमध्ये झाला. पूर्व आश्रमाचे मांग असलेले हे घराणे तसेच कला गायकीत निपून... सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगांव च्या नदीच्या यात्रा-जत्रा मधून अण्णा भाऊंनी आपल्या मावस भावाच्या तमाशातून काम करायला सुरुवात केली. त्या काळात तमाशा वगनाट्याचे स्वरूप ऐतिहासिक पौराणिक राजवाडी थाटाचे होते. तमाशातील गण, गवळण, बतावणी, लावणीकरा व कळवशीलका फार वगनाट्य इत्यादी घटक आण्णाभाऊंनी आत्मसात केले होते.**



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

अण्णा भाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी एका अस्पृश्य समाजातील मातंग जातीमध्ये झाला. पूर्व आश्रमाचे मांग असलेले हे घराणे तसेच कला गायकीत निपून... सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगांव च्या नदीच्या यात्रा-जत्रा मधून अण्णा भाऊंनी आपल्या मावस भावाच्या तमाशातून काम करायला सुरुवात केली. त्या काळात तमाशा वगनाट्याचे स्वरूप ऐतिहासिक पौराणिक राजवाडी थाटाचे होते. तमाशातील गण, गवळण, बतावणी, लावणीकरा व कळवशीलका फार वगनाट्य इत्यादी घटक आण्णाभाऊंनी आत्मसात केले होते. म्हनूनच अण्णाभाऊंच्या लोकनाट्यातुन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा लढा उभा राहिलेला दिसतो. शेठ सावकार भांडवलदार हे एकीकडे तर कष्टकरी शेतकरी कामगार हे दुसरीकडे अशा दोन वर्गातील लढा अण्णाभाऊंच्या वगनाट्यतून आपल्याला दिसतो. भांडवलशाही कडून होणारी श्रमिकांची आर्थिक पिळवणूक समाजापुढे प्रखरपणे मांडतांना अण्णाभाऊनी लोकनाट्यचा आधार घेतला. दलित जनतेला त्यांच्यातील माणुसकीची लढाऊ वृत्तीची खिलाडी पणाची उणीव भासत होते. त्यातून उणिवांची जाणीव करून देणारे अण्णाभाऊंचे नवे तमाशे समाजापुढे आले. अण्णाभाऊंची लोकनाट्य ही त्यांनी नुसती लिहिली नाही तर त्यातून त्यांनी कमी केले. अकलेची गोष्ट या वगनाट्य त्यांनी साकारलेला बंडा गवळी असो की खापऱ्या चोर मधील बिलंदर खापऱ्या चोर असो हे सतत अन्यायाच्या विरोधात लढताना दिसतात. त्यांनी लोकनाट्यातून साकरलकली पात्र ताठ मानेने साकारलेली दिसतात बेकायदेशीर शिर्डी चे लक्षण दंभ घोटाळे आडदांड इत्यादी लोकनाट्यातुन अण्णाभाऊंनी तत्कालीन परिस्थितीचे मांडणी केलेली दिसते. अकलेची गोष्ट ही वगनाट्याचे १९४४ साली महाराष्ट्रासह सर्व भारतभर त्याच्या हजारो प्रयोग झाले. लक्षावधी मराठी माणसांनी लोकनाट्यातूनं आपली अस्मिता अनुभवली. तमाशा चे नवे तंत्र अनुभवताना नवे तमाशा गवळण यातून अण्णाभाऊंची प्रतिमा खऱ्या अर्थाने समाजाला दिसली. अण्णाभाऊ चे लोकनाट्य प्रचारकीची असली तरी त्यातून गुलामगिरीतून मुक्त होण्याचा संदेश सापडल्याशिवाय राहत नाही मग ते दुष्काळात तेरावा महिना असो किंवा पेंग्याचं लगीन असो.. या लोकनाट्यातून कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार मात्र चांगला झाला. अण्णाभाऊंनी त्या तमाशातून मूळ कलगीतुऱ्यात झगडा हा त्यांचा त्यांच्या वगनाट्याचा केंद्रबिंदू ठरला. मुंबई माझी या लोकनाट्यात भांडवलदार प्रतिनिधी मराठी कामगाराला प्रश्न विचारतो तो असा माझी मुंबईमधील एक सवाल जवाब.. मुंबईच्या मागणीवर मुलींची म्हणतात... नाना भाषेची अनंत जातीची तू मावशी कशी गेला विष्णू उत्तर देतो जशी गरुडाला पंख आणि वाघाला नखत अशी ही मराठी मुलखाचा कला मुलींचे म्हणतत... आम्ही सोडून घरदार तिचा वाढवा या व्यापार पेरला का बोला विष्णू उत्तर देतो नदीला.. बगळा जमून सगळा टपून बसला कशाला... अशा प्रकारच्या तत्कालीन प्रश्र्नावर भाष्य करणारे काव्य व त्या काव्यातील अशा गुणांमुळे ते आजही काव्य विलोभणीय वाटतात. अण्णाभाऊंच्या नव्या तमाशाने पुर्वीच्या तमाशा शब्दाचा परंपरागत अर्थ बदलून टाकला आहे. तमाशा लोक कलेला तमाशा क्षेत्रात अपूर्व अशी क्रांती घडून पुरोगामी रंगमंचाच्या एका भव्य दालनाचा दरवाजा उघडून दिला आहे. १९५० ते १९६२ हा काळ अण्णाभाऊंचे साहित्यक्षेत्रातील सुवर्णकाळ होता. याच काळात त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृत्ती निघाल्या प्रचंड यशस्वी होत असताना त्याचे स्वतःचे जीवन मात्र धकाधकीचे होत होते. मुंबई सरकारने लाल बावटा या कला पथकावर बंदी घातली होती. पुढे तमाशावरही बंदी आली. तमाशातील कलाकारांचे संसार देशोधडीला लागले अण्णांनी तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर करून तमाशा कलेचा उद्धार केला व गतवैभव मिळवून दिली. या सर्व काळात त्यांनी वैजयंता, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, फकिरा अशा तीनशेच्या वर कथा कोळवाडी बर बर बहुरंगा, गंधारी प्रश्न, काठच्या कथा तसेच स्टालिनग्राडचा पोवाडा महाराष्ट्राची परंपरा मुंबईचा कामगार असे पोवाडेही लिहिले. त्यांच्या साहित्याचे हिंदी, गुजराती, उडिया, बंगाली, तमिळ, मल्याळम या भाषेत या भारतीय भाषेबरोबरच रशियन, पोलिश, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. लेखणीचे हत्यार बनवून आण्णाभाऊंनी पुरोगामी विज्ञाननिष्ठ स्त्रीवादी लढाऊ अविष्काराचा दीपस्तंभ मराठी साहित्याच्या क्षेत्रात उभा केला. अण्णाभाऊंचे साहित्यक्षेत्रातील कार्य एखाद्या दीपस्तंभासारखे होते. व्यक्तिगत जीवनातील उपेक्षेचा झंझावात आणि आर्थिक विस्ना अवस्थेचे वादळ झेलूनही अण्णाभाऊ सतत सर्वसामान्यांसाठी संघर्षरत रहित राहिले. वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान लोकनाट्य द्वारे मांडीत साम्यवादाचे प्रवर्तक म्हणून कार्यरत राहिले... त्यांचे जीवन खरोखरच प्रेरणादायी होते. आज त्यांची जयंती असल्यामुळे सर्व समाजाने ह्या अशा महान लेखकाचा आदर्श घ्यायला पाहिजे...

**- प्राचार्य शंकर सानवणे, लातूर**

# लातूर जिल्ह्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना प्रलंबित कल्याणकारी अर्थसहाय्य योजनाची अंमलबजावणी करावी!

**देवणी/प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजना महाराष्ट्र राज्य शासनामार्फत राबवले जाते पाल्याचे शैक्षणिक अनुदान शहरी-ग्रामीण घरकुल अर्थसाह्य अनुदान प्रलंबित असून कामगारांना मिळत नाही, फक्त जाहिराती केले जाते प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी यांना न्याय हक्क मिळवून द्यावे आसे निवेदनाद्वारे सहाय्यक कामगार आयुक्त लातूर त्यांच्याकडे श्रमिक हक्क अभियान यांनी मागणी केली आहे.

याबाबत अधिक माहिती असे की लातूर जिल्ह्यात ऑनलाइन नवीन नोंदणी बांधकाम कामगार दाखल अर्ज केल्यानंतर मेसेज द्वारे त्रुटी कळवले जाते ९० टक्के कामगारांना मेसेज समजत नाही,काही ना मेसेज येतच नाही, अर्ज तपासणी त्रुटि अशी काढले जाते की बांधकाम कामगार असल्याचे प्रमाणपत्र मुख्याधिकारी यांचे सहीचे असले पाहिजे अशी सक्तीकरून नवीन नोंदणी नाकारली जाते, नगरपरिषद, नगरपंचायत कार्यालयातील मुख्याधिकारी संबंधित कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देण्याचे अधिकार विभागून दिले जाते उदाहरणात मृत्यु प्रमाणपत्र, जन्म दाखला प्रमाणपत्र, ना हरकत प्रमाणपत्र, बांधकाम कामगार प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रावर कोणत्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी असली पाहिजे हे कामगार ठरवू शकत नाही व बांधकाम कामगार कार्यालयातील कर्मचारी अधिकारी नगरपंचायतीने नियमावली ठरवू शकत नाही असे निवेदनात नमूद करून बांधकाम कामगार कार्यालयामध्ये मजुरांना न्याय मिळत नाही, विविध कल्याणकारी योजना प्रलंबित अर्थ साहाय्य वेळेत का मिळत नाही, लाक डाऊन असल्याचे चुकीचे कारण सांगून वार्षिक फी पावती घेतली व दिली जात नाही याची चौकशी व्हावी, कामगाराची हेळसांड दूर करावी, कामगारांना वागणूक चांगली द्यावी,मॅसेज पाठवणे ऐवजी कामगारांच्या पत्त्यावर त्रुटी मंजुरी बाबत पत्र पाठवावे, तसेच तालुकानिहाय शासकीय प्रतिनिधी आठवड्यातून एक दिवस नेमावा, कामगार मजुरांना विविध कल्याणकारी योजनांची अर्थसाह्य जलद गतीने मिळावे, ऑनलाइन तपासणी मधील अडचणी दूर करावे कामगारांना न्याय द्यावे, न्याय देण्यास विलंब झाल्यास श्रमिक हक्क अभियानामार्फत आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन सहाय्यक आयुक्त कामगार लातूर सचिव, कार्यकारी अधिकारी कामगार महाराष्ट्र मंडळ मुंबई, कामगार मंत्री हसन मुश्रीफ मंत्रालय मुंबई. जिल्हाधिकारी लातूर यांना निवेदन पाठवले असून या निवेदनावर श्रमिक हक्क अभियानाचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर सूर्यवंशी, महिला आघाडी बालिका होळकर, प्रमुख सल्लागार पांडुरंग कदम, जिल्हा अध्यक्ष दशरथ कांबळे तालुका सचिव परमेश्वर होळकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

02 TO 08 AUGUST 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 31/07/2021 10:00 PM Page 1



### कारगिल विजय दिनानिमित्त कारगिल योद्धांचा राजभवन येथे सन्मान

# शूरवीर जवानांचे शौर्य व वीरमातांचे धैर्य यामुळेच देश सुरक्षित -राज्यपाल




**मुंबई/प्रतिनिधी**

हुतात्मा जवानांच्या कुटुंबियांना आपले हृदय किती घट्ट करावे लागते हे आपण प्रत्यक्ष पाहिले आहे, देशाचे शूरवीर जवान व अधिकारी यांचे शौर्य तसेच वीरमाता व हुतात्मा जवानांच्या कुटुंबियांच्या धैर्य व त्यागामुळेच देश सुरक्षित आहे, असे प्रतिपादन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले. कारगिल विजय दिनाच्या २२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते सोमवारी (दि. २६) कारगिल योद्ध्यांचा तसेच हुतात्मा जवानांच्या कुटुंबियांचा राजभवन येथे सत्कार करण्यात आला. यावेळी हुतात्मा कॅप्टन विनायक गोरे यांच्या वीरमाता अनुराधा गोरे लिखित 'अशक्य ते शक्य'...कारगिल संघर्ष' या पुस्तकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. कारगिल युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करताना राज्यपाल कोश्यारी म्हणाले की, भारताला शांती हवी असली आहे. देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून देशाच्या सुदूर सीमावर्ती भागात चांगले रस्ते व सुसज्ज हवाई तळ उभारण्यात आले आहेत. सन १९६२ मध्ये आपण विद्यार्थीदशेत असल्यापासून आजपर्यत देशाचे अनेक जवान व अधिकारी हुतात्मा झालेले पहिले, खुद्द आपल्या २२ वर्षीय बहिणीचे पती १९६२ च्या युद्धात शहिद झाले, असे राज्यपालांनी सांगितले.

कारगिल युद्धात भारताची रणनीतीही जिंकली आणि कूटनीतीही जिंकली असे सांगून डोकलाम व गलवान या ठिकाणी चीनने नव्या भारताचे सामर्थ्यवान रूप पाहिले असे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. 'अशक्य ते शक्य' हे पुस्तक केवळ युद्धकथा नाही तर तो कारगिल युद्धाकडे पाहणारा समग्र ग्रंथ आहे असे त्यांनी सांगितले. राज्यपालांच्या हस्ते महावीर चक्र विजेते हवालदार दिगेन्द्र सिंह, हवालदार दीप चंद, घातक पलटणचे हवालदार मधुसूदन सुर्वे, हवालदार पांडुरंग आंब्रे व हवालदार दत्ता चव्हाण, स्क्वाड्रन लीडर राहुल दुबे, कॅप्टन रुपेश कोहली, कॅप्टन विद्या रत्नपारखी, सविता दोंदे, कर्नल सुशांत गोखले यांच्या आई रोहिणी आनंद गोखले व कर्नल संदीप लोलेकर यांच्या भगिनी कोमल शहाणे यांचा सत्कार करण्यात आला. लेखिका अनुराधा गोरे यांनी अशक्य ते शक्य' हे पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा व भूमिका स्पष्ट केली. ग्रंथाली प्रकाशन संस्थेचे दिनकर गांगल व सुदेश हिंगलासपुरकर यांचा यावेळी राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुरुवातीला राज्यपालांनी कारगिल युद्धविषयक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाला आमदार मंगलप्रभात लोढा, लोढा फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजू लोढा, अनुराधा गोरे व मुंबई प्रभागाचे प्रमुख एअर व्हाईस मार्शल एस आर सिंह प्रामुख्याने उपस्थित होते. व्हॉइस ऑफ मुंबई व लोढा फाउंडेशन यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हर्शल कंसारा यांनी सूत्रसंचलन केले.

## होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांच्या मागण्यांबाबत राज्यशासन सकारात्मक – आरोग्यमंत्री राजेश टोपे



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांच्या मागण्यांबाबत राज्यशासन सकारात्मक आहे, अशी ग्वाही देताना राज्यात शासकीय होमिओपॅथी दवाखाने सुरु करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिले. मंत्रालयात होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांच्या मागण्यांबाबत बैठक झाली. यावेळी आमदार विक्रम काळे, आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ.रामास्वामी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ.उत्तुरे, आयुष संचालक डॉ.कोहली, केंद्रीय होमिओपॅथी परिषदेचे माजी उपाध्यक्ष डॉ अरुण भस्मे, विद्यापीठाच्या विद्या परीक्षेचे सदास्य डॉ. बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते. शासकीय होमिओपॅथी दवाखाने सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करावा, असे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी तसेच आपत्कालीन वैद्यकीय सेवेच्या (क्र.१०८) रुग्णवाहिकांमध्ये होमिओपॅथी डॉक्टरांना नियुक्ती मिळावी यासाठी त्यासंदर्भात असलेले न्यायालयाचे निर्णय याबाबत विधी व न्याय विभागाचे मत नोंदण्यात येईल, असे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. केंद्रीय आरोग्य मंत्र्यांची भेट घेण्यात येणार असून त्यावेळी त्यांच्याशी होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांच्या मागण्यांसंदर्भात चर्चा केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. सीसीएमपी कोर्स केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना महाराष्ट्र वैद्यक परिषदेमध्ये नोंदणी मिळण्यासंदर्भात विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले. यावेळी महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेचे प्रशासक डॉ. सोमनाथ गोसावी,राष्ट्रीय होमिओपॅथी कमिशनच्या सल्लागार परिषदेचे सदस्य डॉ. प्रमोदींनी पागे, डॉ. बाळकृष्ण गायकवाड, परिषदेचे रजिस्ट्रार वैद्य सोनमांकार आदी उपस्थित होते.

## अक्कलकोट दक्षिण पोलिसांनी साडे चार लाखाचा अवैध तांदूळ पकडला!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

कर्नाटकातून उमरग्याकडे अक्कलकोटमार्गे जात असलेला तांदुळाच्या ट्रक संगोळगी ता.अक्कलकोट गावच्या अलीकडील पुलावर अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलिसांनी सापळा रचून पकडला. दहा लाखाच्या ट्रकसह चार लाख ५८ हजारचा तांदूळ असे सुमारे १४ लाख ५८ हजार रुपयांचे मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याचे अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की याची फिर्याद पोलीस हेडकॉन्स्टेबल अजय तानाजी भोसले बक्कल नंबर ८२४ नेमणूक अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन यांनी दिली आहे. या घटनेतील संशयित आरोपींची नावे शिवकुमार शंकर राठोड रा.गुलबर्गा कर्नाटक राज्य, राहुल सुभाष जाधव रा.सिटीफार्म तांडा, ता.आळंद , जि.गुलबर्गा असे आहेत. २६ जुलै रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास क्रमांक केए २२ ०३६७ मधून केबावी तालुका सुरपूर जिल्हा यादगिर राज्य कर्नाटक येथून अज्ञात तांदळाच्या मालकाचा साठविलेला सुमारे ४ लाख ५८ हजार ७०० रुपये किमतीचा तांदूळ ट्रकमध्ये भरून उमरगा जिल्हा उस्मानाबाद येथे जात असताना पोलिसांनी पकडला. इन्वाईस मधील तांदूळ व पंचनाम्यात मालट्रकमध्ये मिळालेले तांदूळ यात तफावत आढळून आल्याने पोलिसांनी संशयित गुन्हेगारावर अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक छबु बेरड हे करीत आहेत.

## आशा भोसले यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर

### हा राज्य शासनाचा बहुमानच–अमित देशमुख



**मुंबई/प्रतिनिधी**

'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारासाठी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांची एकमताने निवड करणे हा राज्य सरकारचा बहुमानच असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख यांनी सांगितले. तर महाराष्ट्र भूषण' पुरस्कार म्हणजे घरच्यांकडून झालेले कौतुक आहे, या शब्दांत श्रीमती आशा भोसले यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्य शासनाचा २०२१ चा महाराष्ट्र भूषण' पुरस्कार ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना जाहीर झाला आहे. त्याबद्दल सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांची त्यांच्या लोअर परळस्थित निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी संगीतकार राहुल रानडे यांच्यासह सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. देशमुख यांनी यावेळी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना पुष्पगुच्छ, महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाल्याचा शासन निर्णय, आशा भोसले यांच्या कारकिर्दीवर आधारित सुवर्णरंग' हे पुस्तक आणि महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रकाशन असलेल्या लोकराज्य' अंक यावेळी भेट म्हणून दिला. भारतरत्न लता मंगेशकर आणि महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झालेल्या आशा भोसले या संगीतातील एक चमत्कार आणि दैवी शक्ती आहेत आणि त्यामुळेच आशा भोसले यांची एकमताने या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. राज्य शासन महाराष्ट्रात संगीत विद्यापीठ सुरू करण्यासंदर्भात आग्रही असून यासाठी संगीतातले दिग्गज यांची मदत घेतली जाणार असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री देशमुख यांनी सांगितले. महाराष्ट्रभूषण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपाध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार, सदस्य सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील–यड्रावकर, विभागाचे सचिव आणि सांस्कृतिक कार्य संचालकांसह समितीचे अशासकीय सदस्य डॉ. अनिल काकोडकर, प्रकाश आमटे, बाबा कल्याणी, संदीप पाटील, दिलीप प्रभावळकर यांचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. देशमुख यांनी आभार मानले आहे. राज्य शासनामार्फत हा पुरस्कार सोहळा येत्या ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात आयोजित करण्याचे प्रयोजन करण्यात येत असल्याची माहिती देशमुख यांनी दिली.

दरम्यान आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले आहेत आणि त्यासाठी आपण सर्वांचे आभारी आहोत. पण महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार वेगळा आहे कारण हा माझ्या मातीने केलेला माझा गौरव आहे. हा पुरस्कार जाहीर होणे म्हणजे घरच्यांकडून माझे कौतुक झाले आहे असे मी मानते. या पुरस्कारासाठी मी राज्य शासनाची आभारी आहे. सध्या राज्यात कोविडचे संकट अजूनही संपलेले नाही. तर गेल्या आठवड्यात चिपळूण, सांगली, कोल्हापूर येथे अतिवृष्टीमुळे बरेच नुकसान झाले आहे. राज्यातील परिस्थिती आटोक्यात आल्यानंतर सन्मानसोहळा आयोजित करावा अशी विनंतीही आशा भोसले यांनी केली.

## राज्यातील पूरग्रस्तांना एमआयडीसीकडून भरीव मदत




**मुंबई/प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टी तसेच पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे २५ हजार पूरग्रस्त कुटुंबियांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्यावतीने जीवनावश्यक वस्तुंची मदत रवाना करण्यात आली. यासाठी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी पुढाकार घेतला. महापुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या कोकण किनारपट्टी तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागांतील नागरिकांना एमआयडीसीद्वारे अन्नधान्यांचे वाटप केले जात आहे. यामध्ये राशन, चादरी, बेडशिट, टॉवेल, अन्नपदार्थ आदीचा समावेश आहे. याशिवाय पाच ट्रकद्वारे पिण्याचे शुद्ध पाणी पुरविण्यात येत आहे. ज्या गावांना एमआय़डीसीद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे, तेथील बिघाड दुरुस्त करण्यात आला असून काही ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. एमआयडीसीच्या राज्यातील ठिकठिकाणच्या कार्यालयातून ही मदत पूरग्रस्त भागांकडे पाठविण्यात आली आहे. ठाणे, डोंबिवली, पुणे, औरंगाबाद, नाशिक आदी प्रादेशिक कार्यालयांकडून ही मदत देण्यात आली. ठाणे, डोंबिवली एमआयडीसीकडून १००० राशनची पाकिटे (२५ हजार किलो), २००० पाण्याच्या बाटल्या, ५५०० बँकेट्स, ५५०० टॉवेल्स पाठविण्यात आले तर औरंगाबादमधून ५०० अन्नधान्याची पाकिटे पाठविण्यात आली. कोकण किनारपट्टी तसेच पश्चिम महाराष्ट्रावर पुरामुळे मोठे संकट कोसळले आहे. येथील सुमारे २५ हजार कुटुंबियांना एमआयडीसीच्यावतीने मदत दिली जात आहे. पुढील दोन दिवसांत मदतीचे वाटप केले जाणार आहे. शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या मागे खंबीरपणे उभी असल्याची भावना देसाई यांनी व्यक्त केली.

## सध्देश्वर चौक गावात रक्तदान शिबीरात १०१ जणांचे रक्तदान

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील सिध्देश्वर चौक गाव भागातील परिसरातील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर मगर यांच्या पुढाकारातून वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्च्याचे शहर जिलहाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात १०१ जणांनी रक्तदान केलेले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमिवर सामाजिक बांधिलकीतून घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीराला पदाधिकारी व कार्यकर्त्यातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. त्यांच्या या सामाजिक कार्याचा आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.सध्या जगभरात कोरोनाचे संकट आल्यामुळे सर्वसामान्य जनतेवर वाईट दिवस आलेले आहेत. अशा परिस्थितीत रक्तदानाची गरज असतानाही रक्तदानासाठी कोणीही पुढे येत नाही. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक बांधीलकीच्या दृष्टिकोणातून ज्ञानेश्वर मगर यांनी पुढाकार घेऊन स्वतःच्या वाढदिवसानिमित्त भाजपा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर, मनपा आरोग्य सभापती अनिल शिंदे, विनोद मस्के, सागर घोडके, पंकज देशपांडे यांच्या उपस्थितीत घेतलेल्या रक्तदान शिबीरात १०१ जणांनी रक्तदान हेच जीवदान समजून रक्तदान केले.यावेळी पंकज शिंदे, बंटी गवारे, सौदागर घोलप, शंकर मगर, सचिन ऐतनबोने, आकाश घोलप, निलेश कांबळे, साहिल शेख, मंगेश मठपती, स्वप्निल गायकवाड, प्रदिप पवार, राजु आडसूळे, विकास मगर, शंभू आरागडे, महेश ईगवे, सौरभ दासरे, पवन शिंदे, दिपक राठोड, विवेक मस्के, गोपाळ मगर, दिपक मस्के, अविनाश मगर, पंकज मगर, खंडू मगर, आनंद मगर, रितेश बुरले, सुजीत गायकवाड, अभी नागमोडे, निखील कदम, सुरज भोसले, जयतोष सोमवंशी आदी पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वसई–विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'एच' नवघर–माणिकपूर**

**जाहीर नोटीस**

वसई–विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | दिवाणमान ६/१ | VN28/14153 | प्रदिप वासुदेव बंगले | निरंजन प्रभाकर आरोंदेकर |
| २ | बऱ्हामपूर | VN14/39630 | वर्षा विनोद नायर | एलाइस मार्टिन कोयलो व हेझल एलायस कोयलो |
| ३ | उमेळमान | VN01/61962/26 | स्वीट होम इंटरप्रायजेस | रघुनाथ नरहरी साळगांवकर व इतर १ |
| ४ | माणिकपूर २/१ | VN19/34879 | इनास सांतान मिनेझीस | स्टॅनी इनास मिनेजीस व इतर ३ |
| ५ | नवघर ३ | VN08/38857 | कमल हिरेन गाला | रुपचन्द हेमाराम चौधरी |
| ६ | दिवाणमान ५/२ | VN27/11381 | सुरेशचंन्द्र हरिलाल मेहता | उषा सुरेंशचन्द्र मेहता व सौरभ सुरेश मेहता |
| ७ | बऱ्हामपूर | VN14/51970 | हेना प्रदीप नायर | ऋजुता स्वप्निल वैती व स्वप्निल कैलास वैती |
| ८ | नवघर १/२ | VN04/31362 | पुजा जितेश माणिक | प्रशांत प्रकाश पिटलेकर |
| ९ | बऱ्हामपूर | VN14/62122/65 | विजय हाइट्स | विन्नी वालेरेन सलडाना व वालेरेन अँड्र्यू सलडाना |
| १० | उमेळमान | VN01/40633/3 | रुपाली राकेश घरत | राकेश प्रकाश घरत |
| ११ | चुळणा | VN02/56688 | उन्नीपरमबथ राजगोपालन मेनन व इतर १ | प्रकाश दामोदरदास भट्ट |
| १२ | नवघर ५/२ | VN13/31084 | अशोक एस. मिराशी | सीमा देवी व राजकुमार विश्वकर्मा |
| १३ | दिवाणमान ५/२ | VN27/11386 | सुरेशचंन्द्र ह. मेहता व उषा सुरेशचंन्द्र मेहता | उषा सुरेंशचन्द्र मेहता व सौरभ सुरेश मेहता |
| १४ | बऱ्हामपूर | VN14/39666 | जयचंद्रन सुकुमारआशन पिल्लई व इतर १ | दिक्षा हरेश्वर म्हात्रे |
| १५ | चुळणा | VN02/61249 | जेआरएक्स डेव्हलपर्स | राकेश विनोदभाई पटेल व अर्चना राकेश पटेल |
| १६ | बऱ्हामपूर | VN14/61965/15 | सॅन्ड्रा नाथन व झॅकरी ग्लेन नाथन | सुमन संतोष कनौजिया व संतोष रामब्रीच कनौजिया |
| १७ | बऱ्हामपूर | VN14/61965/16 | मुन्ना रामब्रीज कनौजिया व इतर २ | संतोष रामब्रीच कनौजिया |
| १८ | उमेळमान | VN01/61935/1 | कृपाशंकर सुरेन्द्रप्रताप दुबे | मंगेश शिवाजी राणे |
| १९ | नवघर ३ | VN08/28981 | मधुकर बाळा चौकेकर | बाळकृष्ण मधुकर चौकेकर |
| २० | नवघर | VN08/28777 | मधुकर बाळा चौकेकर | बाळकृष्ण मधुकर चौकेकर |

जावक क्र. : वविशम/१६७५/२०२१–२२
दिनांक : २२/०७/२०२१

**सही/–**
**(ग्लिसन घोन्सालवीस)**
**सहा.आयुक्त (प्रभारी)**
**प्रभाग समिती 'एच'**
**वसई–विरार शहर महानगरपालिका**

## पान १ वरून....

### कसले पोलीस आणि कसले सरकार ...

उदयगिरी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले होते तेथे डॉ. माधव चंबुले यांनी एचआरसीटी स्कॅन तसेच रक्त तपासणी केली. सदर तपासणीत शांताबाई यांचा एचआरसीटी स्कोर ८ आल्याने त्यांना डॉक्टरांनी औषध गोळ्या लिहून घरीच उपचार घ्यायला सांगितले. मात्र १६/४/२०२१ रोजी त्यांना पुन्हा श्वसनाचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना पुन्हा उदयगिरी हॉस्पिटलमध्ये नेले. तेथे त्यांना आयसीयुमध्ये दाखल करून डॉ. चंबुले यांनी उपचार सुरु केले. तसेच त्यांचा एचआरसीटी स्कोर ११ आल्याने त्यांना कोरोनाची बाधा झाल्याचे सांगून डॉक्टरांनी ६ रेमडेसिवीर इंजेक्शन आणायला सांगितले. त्यामुळे शांताबाई यांचे पुत्र महेश कुमार इंजेक्शन आणायला गेले, पण त्यांना कुठेच रेमडेसिवीर इंजेक्शन सापडले नाही. त्यामुळे ते हॉस्पिटलमध्ये आले व डॉ.चंबुले यांना भेटून तुम्हीच कुठे रेमडेसिवीरची व्यवस्था होते का बघा अशी विनंती केली. त्यानंतर डॉ. चंबुले यांनी महेशकुमार यांना १७/४/२०२१ रोजी ११.०० वाजता हॉस्पिटलमध्ये बोलावले. त्यानुसार महेशकुमार ११.०० वाजता डॉक्टर डॉ. चंबुले यांच्या केबिनमध्ये गेले असता तेथे डॉ.नामदेव गिरी उपस्थित होते. त्यावर डॉ. चंबुले यांनी सांगितले कि यांच्याकडे रेमडेसिवीर आहे ज्याची एका बाटलीची किंमत १५ हजार असून आता त्यांच्याकडे दोन बॉटल आहेत आणि संध्याकाळपर्यंत ४ बॉट मिळतील अशा पद्धतीने, डॉ.नामदेव गिरी यांच्याकडून महेशकुमार यांनी त्यांच्या कोरोन बाधित आईसाठी सहा बॉटल घेतल्या आणि १८ एप्रिल ते २१ एप्रिल २०२१ पर्यत महेशकुमार यांच्या आईला चार इंजेक्शन देण्यात आली. मात्र सर्व ६ इंजेक्शचे ९० हजार महेश कुमार यांनी डॉ. चंबुले यांना दिले. मात्र २/५/२०२१ रोजी महेशकुमार यांची आई शांताबाई यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांच्या आईवर त्यांच्या मुळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान महेशकुमार यांनी रेमडेसिवीरच्या सर्व बॉटल्या आपल्याकडे ठेवलेल्या होत्या. याच दरम्यान १२/५/२०२१ रोजी महेशकुमार यांच्या एका नातेवायीकाने दिलेल्या रेमडेसिवीर इंजेक्शनच्या बॉटल आणि डॉ. चंबुले कडून महेशकुमार यांनी घेतलेली दोन इंजेक्शनच्या रिकाम्या बॉटल मधील शिल्लक डोस यांच्या रंगत तफावत दिसली. महेशकुमार यांनी नातेवाईकांकडून घेतलेल्या खाली बॉटल मधील थोड्या शिल्लक राहिलेल्या डोसचा रंग पाण्यासारखा होता, तर डॉ. चंबुले व डॉ.गिरी यांच्याकडून घेतलेल्या डोसच्या बाटलीतील रेमडेसिवीरचा रंग तपकिरी होता. त्यामुळे महेशकुमार यांना संशय आला व त्यांनी तत्काळ त्यांच्याकडच्या रिकामी आणि एक भरलेल्या रेमडेसिवीर इंजेक्शनच्या बॉटलचा फोटो काढून माल्यन या कंपनीला पाठवला असता हे आमचे प्रोडक्ट नाही असे कंपनीने कळवले. याचा अर्थ डॉ.गिरी, डॉ. चंबुले यांनी ९० हजारांच्या ६ रेमडेसिवीर इंजेक्शनच्या ज्या बाटल्या महेशकुमार यांना दिल्या त्या बनावट होत्या आणि या पैकी चार बनावट इंजेक्शन महेशकुमार यांच्या आईला देण्यात आली आणि इंजेक्शन बनावट असल्यामुळेच त्यांच्या आईचा मृत्यू झाला. त्यानंतर सर्व पुराव्यानिशी फिर्याद नोंदवायला गेलेल्या महेशकुमार यांची उदगीर ग्रामीण पोलिसांनी फिर्याद सुद्धा नोंदवून घेतली नाही किंवा या प्रकरणानंतर अन्न व औषध प्रसाधन विभागाने सुद्धा याची दाखल घेतली नाही. कोरोनामुळे लातूर, उस्मानाबाद, नांदेडमध्ये मोठ्या संख्येने लोक मृत्युमुखी पडले होते. त्यातील कित्येकांनी रेमडेसिवीर इंजेक्शन घेतली होती, तरीही त्यांचा मृत्यू झाला. याचा अर्थ त्यानांही बनावट रेमडेसिवीर इंजेकशन देण्यात आलेली होती. त्यामुळे आता या संपूर्ण प्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोनि दीपक वाघमारे आणि या संपूर्ण रॅकेटमध्ये सामील असलेले डॉक्टर, पोलीस, औषध विक्रेते आणि अन्न व औषध प्रसाधन विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक करावी अशी मागणी लातूर जिल्ह्यातील जनतेने केली आहे.

### स्थानिक तरुणांच्या धाडसामुळेच ...

तर आयसीआयसीआय बँकेच्या त्या दुसऱ्या जखमी महिलेवर उपचार करण्यास नकार देणाऱ्या भूषण हॉस्पिटलच्या डॉक्टरांना विरारची जनता शिव्या घालीत असून कोरोना काळात त्यांनी ज्या रुग्णांच्या नातेवायीकांना फसवले आहे त्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी करीत आहेत. विरारच्या त्या घटनेनंतर खरे देवदूत कोण त्या दुर्दैवी महिलांच्या मदतीला धावणारे त्या भागातील ते धाडसी तरुण कि जखमी महिलेवर उपचारास नकार देणारे भूषण हॉस्पिटल मधील ते उलट्या काळजाचे डॉक्टर याचा फैसला आता विरारच्या जनतेने करायचा आहे. पोलिसांची नेहमी प्रमाणेच या प्रकरणात उशिरा इंट्री झाली. आता पुढचा तपास त्यांना करायचा आहे. त्या दोन महिलांवर हल्ला करून बँकेतील रोकड आणि दागिने लुटण्याचा प्रयत्न करणार तो क्रूरकर्मा त्या बँकेचा माजी व्यवस्थापक असून त्याला न्यायालयाने ६ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. विरार रेल्वे स्थानकाजवळच पूर्वेला मानवेल पाडा रोडवर आयसीआयसीआय बँक आहे. गुरुवारी सायंकाळी बँकेचे काम आटोपून बँक अधिकारी योगिता वर्तक या तेथून निघण्याच्या तयारीत असतानाच तेथे बँकेचा माजी व्यवस्थापक अनिल कुमार राजदेव दुबे तिथे आला व आपले काही दागिने बँकेच्या लॉकरमध्ये असल्याने मला चावी हवी असे म्हणून त्याने योगिता कडून लॉकरची चावी घेतली आणि बँकेतील दागिने आणि रोकड मिळून ३ कोटी ८० लाखांची रक्कम बॅगेत भरून निघाला होता. पण योगीताने त्याला रोखले. त्यामुळे त्याने योगीतावर सपासप वार केले. या हल्ल्यात योगीताचा जागीच मृत्यू झाला, तर अनिल कुमारला रोखण्यास पुढे आलेल्या रोखपाल श्रद्धा देवरुखकर हिच्यावरही त्याने वार केले तशी तीही खाली पडली. पण तिने सायरन वाजवून आरडाओरडा करताच बँकेच्या मागच्या गल्लीने पळत सुटलेल्या अनिल कुमारच्या मागे तिथले लोक धावले. पण त्याने त्याच परिसरात पुढे आपली मारुती स्विफ्ट कार पार्क केली होती आणि त्यात बसून तो पळणार होता. पण मागे जमाव लागल्याने गोंधळाला आणि शास्त्री विद्यालयाच्या समोर खाली पडला. तसे तिथल्या तरुणांनी त्याला धरले आणि चोप देत पुन्हा बँकेजवळ आणले. यावेळी जखमी श्रद्धाचे कपडे फाटले होते. मात्र तिथल्या भावेश चव्हाण नावाच्या तरुणाने रस्त्यावरून जाणाऱ्या मुलीकडून ओढणी घेत त्या मुलीच्या मदतीने जखमी श्रद्धाला तेथून हाकेच्या अंतरावर असलेल्या भूषण हॉस्पिटलमध्ये नेले. पण तिथल्या डॉक्टरांनी तिच्यावर उपचार करण्यास नकार दिला. त्यामुळे श्रध्दाला विरार पश्चिमेकडील संजीवनी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर दुसरीकडे भावेशच्या मित्रांनी अनिल कुमारला धरून ठेवले होते. त्यातील अमित मिश्र नावाच्या तरुणाने ताबडतोब मोटार सायकलवरून विरार पोलीस ठाणे गाठले व पोलिसान घेऊन आला. त्यानंतर आरोपीला ताब्यात घेऊन पोलीस कारवाई सुरु झाली. मात्र तिथल्या स्थानिक तरुणांनी भावेश चव्हाण, धनंजय सलिया, शाहरुख खान, कुणाल चव्हाण, कुलदीप तिवारी आणि त्यांच्या इतर मित्रांनी या आरोपीला पकडून दिले, तर श्रद्धाचा जीव वाचवला. दरम्यान पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार आरोपी दुबे हा आर्थिक दृष्ट्या कर्जबाजारी झाला होता. या पूर्वी त्याने शेअर बाजारात लावलेले लाखो रुपये बुडाले. त्यामुळे तो कंगाल झाला. सध्या नायगांव येथील ॲक्सिस बँकेत तो मॅनेजर होता असे असतानाही त्याच्या हातून हे कृत्य घडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. घटनेच्या एक दिवसा अगोदर त्याने ॲक्सिस बँकेतही २६ लाखांचा घोटाळा केल्याचे समोर आले असून या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल कुमार याने आतापर्यंत किती बँकांना चुना लावलाय याचा आता पोलीस तपास करतीलच पण या प्रकरणात निष्पाप बळी गेलेली योगिता मात्र परत येणार नाही.

### रक्ताचे नाते अखेर कलंकित ठरले...

गावातच कामाला जात होती. म्हणून हाताखाली आलेल्या विजयला ते काही तरी कामधंदा बघ, असे सांगत होते. विजयचे शिक्षण कमी झाल्याने त्याला चांगली नोकरी कुठे मिळेल याची गॅरेटी विलास यांना नव्हती. आपल्या घरची परिस्थिती ओळखून ते त्याला कामाला जा. चार पैसे तुझ्यापुरते तरी मिळव. आणखी एक दोन वर्षात चांगली मुलगी बघून तुझे लग्न करून ही देतो असे ते त्याला सांगत होते. पण विजय मात्र कोणताही कामधंदा न करता दिवसभर नुसता चकत्या पिसून राहत होता.मित्रांच्यबरोबर उनाडक्या करीत फिरत होता. त्यातूनच त्याला दारू पिण्याची सवय लागलेली होती. सुरूवातीला त्याची दारू पिण्याची सवय ही त्याच्या आई वडिलांना माहित नव्हती. मुलगा मोठा झाला आहे. त्याला काही कामधंदा नाही, म्हणून ते तो मागेल त्यावेळी त्याला पैसे खर्चाला देत होते. तो मात्र त्यांनी दिलेल्या पैशातून दारू पित होता. तर कधी कधी मित्रांच्याबरोबर पानाचा डाव ही खेळत होता. त्यातून तो कर्जबाजारी ही झाला होता. अलिकडे तर तो दारु पिऊन येऊन घरात आई वडिलाबरोबर भांडण काढत होता. खर्चाला पैसे दिले नाही तर तो त्यांना मारहाण ही करायला मागे पुढे बघत नव्हता. आपला मुलगा विजय हा वाईट मुलांच्या संगतीने बिघडत चालला आहे हे त्याच्या लक्षात आले होते. विलास यांच्या ते लक्षात आल्यावर गेल्या काही महिन्यापूर्वी त्यांनी त्याला आपल्या नातेवाईकाकडे राहण्यास ही पाठविले होते. तेथे विजय हा काही जास्त दिवस राहयला नाही. तो लगेच आपल्या कवलापूर या गावी आला. गावी आल्यावर देखील त्याच्या वागण्यात काही फरक पडला नाही. तो दारूसाठी पैसे कमी पडले की आपल्या आई वडिलांना त्रास देवून त्याच्याकडून पैसे मागू लागला होता. त्यांनी त्याला पैसे दिले नाही तर तो त्यांना मारहाण करीत होता. आता मात्र विजयच्या असल्या वागण्यावरून त्याच्या आई वडिलांच्या डोक्यावरून पाणी गेले होते. त्यांनी त्याला किती ही समजावून सांगितले तरी तो काही त्याचे ऐकत नव्हता. विजय घरात दारू पिऊन आला की त्याची घरात भांडणे ही ठरलेलीच होती. त्यामुळे ते ही त्याच्या वागण्याला वैतागलेले होते.त्यांना ही काय करावे हे सुचत नव्हते.मुलाच्या पायात बापाचे चप्पल आले की बापाने ही समजून जावे की मुलगा आता मोठा झाला आहे तो काही लहान राहिला नाही. आणि मुलाने ही आई वडिलाच्या म्हणण्याप्रमाणे वागले पाहिजे स्वत:ची जबाबदारी ओळखून राहिले पाहिजे याचे भान विजयला नव्हते. तो वाईट मित्रांच्या संगतीने दिवसे दिवस बिघडत चालला होता. त्याच्यामुळे घरात भांडणे होत होती. विजयला कामधंदा कर म्हटले की तो दारू पिऊन येऊन घरात धिंगाणा घालत होता. ही गोष्ट बाप म्हणून विलास यांना खटकत होती. विजयची आई मात्र त्याचे अपराध आपल्या पोटात घालत होती. तो काही सुधारण्याची चिन्हे दिसत नाही म्हणून विलास पवार यांनी विजय बाबत आपला नातेवाईक उत्तम मदने यांना ही सांगितले होते. उत्तम मदने हे सांगोला जवळील कोळे येथे राहत होते.ते विलास पवार याचे जवळचे नातेवाईक लागत असल्याने त्याचे ही कवलापूर येथे सारखे येणे जाणे असायचे. त्यांनी ही विजयला बऱ्याच वेळेला समजावून सांगून पाहिले होते. परंतु त्याच्या सांगण्याचा ही विजयवर काही फरक पडला नव्हता. उलट तो आपल्या आई वडिलांना माझ्या वागण्याचे तुम्ही नातेवाईकांना सांगून तुम्ही माझी अब्रु काढत आहात, असे म्हणून त्याचेबरोबर भांडण काढत होता. इकडे दिवसे दिवस विजयची चिंता बाप म्हणून विलास यांना लागून राहिली होती. घटनेच्या अगोदरच आठ दिवस विजयने आपल्या आई वडिलांच्याबरोबर भांडण काढून त्यांना जबर मारहाण केली होती.याचा राग बाप म्हणून विलास यांना आलेला होता.मी याला जन्म दिला आहे की याने मला जन्म दिला आहे असे म्हणत ते स्वत:च्या नशिबाला कोसत होते. त्यांनी परत एकदा उत्तम मदने याला बोलावून घेऊन तुच बाबा यातून काही तरी मार्ग काढ असे सांगितले. त्यावेळी त्या दोघांनी विजयबाबत एक वेगळाच विचार केला. विजयला आता कायमचेच गार केले म्हणजे आपल्या मागची पिढा जाईल असे त्यांनी ठरविले.त्यासाठी त्यांनी विजयची गेम करायचे ठरविले. बाप म्हणून मुलाला मारायाला विलास यांना जड होते. त्याचे मन ही त्यासाठी तयार होत नव्हते. परंतू विजयच्या त्रासाला ते कंटाळलेले असल्याने त्यांनी पाहुणा उत्तम मदने याला कसे तरी करून विजयला सपंव असे सांगितले.

घटनेच्या दिवसी म्हणजे १५ जुलै २०२१ रोजी नेहमीप्रमाणे विजय हा घराकडे दारू पिऊन आला. आल्या आल्या त्याने आपल्या वडिलाकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी त्या दोघात या कारणातून मोठी भांडणे झाली. त्या भांडणात विजय हा विलास यांना मारहाण करीत असताना पाहुणा उत्तम मदने यांनी विलास याना सोडविण्यासाठी जात विजयला धरून खाली पाडले. ते दोघे ही आता त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करू लागले.यात तो जमीनीवर गडागडा लोळत होता.अगोदरच त्याला दारूची नशा झाली होती. त्यातच घरी विजयची आई ही नव्हती. त्यामुळे त्याला मारहाण करीत असताना विजयला कोणीच सोडवायला आले नाही.बापाचा राग तर अनावर झाला होता. तो त्याला मर साल्या म्हणत जास्तच चेकाळून मारत हाता.त्यातच उत्तम मदने याने विलास याच्याकडे चाकू दिल्यावर त्याच चाकुने विलास यांनी मुलगा विजयच्या पोटावर, पाठीवर, मानेवर सपासप वार केले. त्यात त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्यावर विजय हा जागीच मरण पावला. त्याचा आपल्या हातून रागाच्या भरात खून झाल्याचे लक्षात येताच विलास आणि उत्तम मदने यांनी भानावर येत कुणाला काही समजण्याच्या आतच त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरविले. गावाजवळ किंवा इतर जवळपास कुठे तरी त्याचा मृतदेह टाकून दिला तर तो लवकर उघडकीस येणार म्हणून विलास यांनी उत्तम मदने याच्या मदतीने त्याचा मृतदेह सांगोला कडे नेऊन विल्हेवाट लावण्याचे ठरविले.उत्तम याला सांगोला कडील सगळा भाग माहित असल्याने त्याला त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची हे चांगल्या प्रकारे माहित होते. म्हणून तो ही या गोष्टीला तयार झाला. इकडे मयत विजयची आई घरी आल्यावर त्यांनी तिला विजयचा आम्ही दोघांनी खून केला आहे. तेव्हा तू कुठे काही बोंब करू नकोस असे सांगत तिला गप्प बसविले. त्यानंतर रात्रीच्या सुमारास विलास आणि उत्तम मदने यांनी मयत विजयचा मृतदेह एका दुचाकीवर ठेवून सांगोल्याकडे गेले. त्यापूर्वी त्यांनी त्याच्या मृतदेहाचे धड वेगळे आणि शीर वेगळे असे केले. त्यानंतर तो मृतदेह एका चटईत गुंडाळून त्यावर शेडनेटमध्ये लपविले. दुचाकीने ते सांगोल्याकडे निर्जन स्थळ शोधत असताना त्यांना सांगोला पोलीस स्टेशनच्या हद्दीत सोपान जनार्दन गडदे यांच्या शेताजवळ असणारा तलाव दिसला. तेथे आल्यावर त्यांनी त्या तलावात विजयच्या मृतदेहाला एका दगडाने दोरीच्या सह्याने बांधले आणि त्याचा मृतदेह त्याला बुध्देहाळ तलावात टाकून गुपचुपपणे घटनास्थळावरून पलायन केले. दोन दिवसांनी विलास पवार हे गावाकडे आले.त्यांनी गावात येऊन विजय हा बेपत्ता झाल्याचे नाटक केले. याबाबतची फिर्याद त्यांनी दि. १८ जुलैला सांगली ग्रामीण पोलीस स्टेशनला दिली. मुलगा विजय विलास पवार (वय २१) हा दारूच्या नशेत भांडण काढून घरातून १५ जुलैला गेला आहे तो अद्याप ही परत आला नाही अशी त्यांनी तक्रार नोंदविली. त्याच्या तक्रारीवरून पोलीस बेपत्ता विजयचा शोध घेत असताना सांगोला पोलीस स्टेशनला गडदे याच्या शेताजवळ असणाऱ्या तलावात एका तरूणाचा धड आणि शीर वेगवेगळे असलेला मृतदेह मिळाला होता. या मृतदेहाचा सांगोला पोलीस तपास करत असताना त्यांनी जवळच्या सर्व पोलीस स्टेशनला त्या मृतदेहाचे फोटो पाठवून ओळख पटविण्याचे काम चालू केले होते. सांगोला पोलीस स्टेशनहून मयत तरूणाची माहिती सांगली ग्रामीण पोलीस स्टेशनला मिळाल्यावर आणि फोटोतील तरूण हा बेपत्ता विजय याच्याशी मिळते जुळते असल्याने सोमवार दि.२६ जुलै रोजी सांगली ग्रामीणचे स.पो.नी.प्रशांत निशानदार हे कवलापूर येथे जावून विलास पवार याच्याकडे बेपत्ता विजयची चौकशी करीत असताना ते पोलीसांना काहीच माहिती सांगत नव्हते तसेच त्यांची पत्नी ही पोलीसांना काहीच सांगत नव्हती. पोलीसांनी त्यांना सांगोल्याजवळ सापडलेल्या मृतदेहाचे फोटो ही दाखविले पण त्यांनी तो मुलगा आपला नाहीच असे पोलीसांना सांगितले. ते काही तरी लपवत आहेत याची शंका पोलीसांना आल्यावर पोलीसांनी विलास पवार यांना पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे आधिक चौकशी केली असता अखेर त्याचा संयमाचा बाध सुटला आणि त्यांनी आपला गुन्हा कबुल करीत विजय याचा खून आपण आणि आपला नातेवाईक उत्तम मदने यांनी केला असून त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट सांगोल्याजवल लावल्याचे पोलीसांनी सांगितले. मयत विजय हा सारखा दारू पिऊन येऊन मला व पत्नीला मारहाण करीत भांडण काढत होता.

अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून तो त्रास देत असल्याने आम्ही त्याला कायमचे संपविले असल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याच्या कबुलीनंतर पोलीसांनी या गुन्हयातील दुसरा आरोपी उत्तम मदने याला ही सांगोल्यातून अटक केली होती. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला असल्याने या घटनेत स्वतः पोलीस फिर्यादी होत विजय विलास पवार (वय २१) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी त्याचा बाप विलास बापू पवार (वय ४८) रा.कवलापूर आणि उत्तम मदने (वय २९) रा.सांगोला याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना सांगली येथील कोर्टात हजर केले असता. मा.कोर्टाने त्याना चार दिवसाची पोलीस कोठडी कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि दुचाकी मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक दीक्षीत गेडाम, अपर पोलीस अधिक्षक मनीषा दुबुले, पोलीस उपाधिक्षक अजित टिके यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी. प्रशांत निशानदार, बाळकृष्ण गायकवाड, रमेश कोळी, कपिल सांळुखे, महेश जाधव आकाश गायकवाड यांनी यशस्वी पणे करून संशयीत आरोपीना कोणताही पुरावा नसताना ताब्यता घेऊन या गुन्हयाची उकल केली.

## वाडा तालुक्यात किशोर वयीन मुलींसाठी आरोग्य शिबीर

**वाडा/वार्ताहर**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन बुधवारी (दि.२८जुलै) वाडा तालुक्यातील कोणसई (मेघावले पाडा) येथे किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचा अनेक मुलींनी लाभ घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या सुचनेनुसार तसेच शहापूर विधानसभा आमदार तथा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख दौलत दरोडा, विक्रमगड विधानसभा आमदार तथा पालघर जिल्हाध्यक्ष सुनील भुसारा, पालघर जिल्हा निरिक्षिका सुनिता देशमुख, पालघर जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा किर्ती मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम प्रसंगी वाडा पं.स.सभापती रघुनाथ माळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे पालघर जिल्हा सरचिटणीस सुरेश पवार, वाडा तालुका महिला अध्यक्षा मृणाली नडगे, वाडा नगरपंचायतीच्या नगरसेविका तथा बांधकाम सभापती सुचिता पाटील, वाडा शहराध्यक्षा अश्विनी भोईर, जि.प.सदस्या रोहिणी शेलार, युवती प्रमुख ज्योत्स्ना सांबरे, राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्या वंदना कलिंगडा, वैशाली म्हसरे, खानिवली प्रा आ केंद्राचे डॉ.दवणे, वाडा ग्रामीण रुग्णालयचे समुपदेशक डॉ.योगेश वाटाणे, आरोग्य सेविका अर्चना आरज, लॅब टेक्निशियन भोये व परिसरातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर्स आदि उपस्थित होते.

## पान ८ वरून....

### महिला कंडक्टरची वृद्ध प्रवाशाला ...

लथाबुक्क्यांनी मारहार केली. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्या मध्ये कैद झाला आहे. या सर्व प्रकाराणे बस कर्मचाऱ्यांच्या निषेध करून दोघांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. तर दोघांनी एकमेकांन विरोध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याचे समजले. या महिला कंडक्टरला झालेल्या प्रकारा बाबत विचारले असता हा प्रवाशी बसमध्ये बसल्या पासून बडबड करत होता. उलट बस स्थानकात झालेल्या झटापटीत माझ्या एका कानातील सोन्याचे फुल, अंगठी, रोख रक्कम गहाळ झाली आहे, तर माझ्या हातातल्या बांगड्या फुटल्या, मोबाईल फुटला या नुकसानीला जबाबदार कोण? असा सवाल करत भांडणाचे मूळ कारण सांगण्याचे टाळले.

दरम्यान सदरचा व्हिडिओ पाहून तक्रारीवरून बोईसरच्या आगार व्यवस्थापकांनी दोन्ही कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे असे वाडा आगार व्यवस्थपक मधुकर धांगडा यांनी सांगितले. तर भांडणाचे कारण काहीही असो राज्य परिवहनच्या कर्मचाऱ्यांकडून वृद्ध प्रवाशाला बस स्थानकाच्या आवारातच अशा प्रकारे मारहाण होत असेल तर ते नक्कीच निंदनीय आहे. अशा कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे, असे वाडा तालुका प्रवाशी संघटनेचे सचिव किरण थोरात यांचे म्हणणे आहे.

### लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने चिपळूण...

किलो व कांदा बटाटे पाच किलो या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे. तर इतर साहित्याचे पाचशे किट पाठविण्यात आले असून यामध्ये सतरंजी, चादर, टॉवेल, साडी, सॅनेटरी नॅपकिन पॅड, पॅन्ट, बरमुडा व अंतर्वस्त्र आदींचा समावेश आहे. तसेच बॉटल बंद पाण्याचे ५०० बॉक्स पाठवण्यात आले असून प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल आहेत. तसेच ३०० ब्लँकेट, २००० मास्क व तांदळाचे पंचवीस किलोचे बारा नग असे साहित्य दोन ट्रक च्या माध्यमातून चिपळूण येथील पूरग्रस्तांसाठी पाठवण्यात आलेले असून या साहित्ययया सोबत मदत कक्षाचे समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी जीवन देसाई गेलेले आहेत. हे साहित्य उद्या चिपळूणमध्ये पोहोचणार असून लातूरकरांच्या स्नेहाची शिदोरी पूरग्रस्तांना मायेची ऊब देणारी ठरेल.

### सर्व मागण्या मान्य झाल्याने कोकाकोला...

कामावर घेण्याचे मान्य केले. तसेच पी.एफ भरण्यासाठी ७ दिवासाची मुदत ठेकेदारांना देण्यात आली. असल्याची माहिती स्वाभिमानी संघटनेचे तालुकाध्यक्ष रविंद्र मेणे यांनी दिली. मध्यस्थी दरम्यान भिवंडी पश्चिमचे आमदार महेश चौगुले, महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेचे उपाध्यक्ष विश्वनाथ दळवी, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जितेश (बंटी) पाटील, पालघर जिल्हा कामगार आयुक्त दहिफळे, कानडे, पोलीस निरीक्षक सुधीर संख्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक आसिफ बेग, तालुका अध्यक्ष रविंद्र मेणे, कंपनी मॅनेजमेंट प्रमुख संग्राम देशमुख, रुपेश परदेशी, ठेकेदार धनंजय चौधरी व नासिर सूसे कंपनी कमिटी मेंबर उपस्थित होते. तर उपोषणाला देवा ग्रुप सचिव तानाजी मोरे, कुणबी सेना पालघर जिल्हा अध्यक्ष प्रदीप पाटील, जयेश पवार, कैलास देवा जाधव, प्रसाद (भाई) पाटील, गटनेते चौधरी, जगदिश पवार, जगादिश पवार, यांनी भेटी देऊन उपोषणकर्ते महेंद्र गायकर, वसंत पाटील, महेंद्र सवर, भरत भोईर, सुरेश धिंडा यांनी उपोषण कर्त्यांची विचारपूस केली व उपोषणाला पाठींबा दिला.

### हरित लातूरसाठी किर्ती ग्रुप कडून ...

करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. पालिकेच्या या उपक्रमाला कीर्ती ग्रुपने बळ दिले. जागतिक निसर्ग संवर्धन दिनाच्या निमित्ताने कीर्ती ग्रुपच्या वतीने विविध प्रकारची साडेपाच हजार झाडे लागवडीसाठी महानगरपालिकेला देण्यात आली आहेत. केवळ झाडे देऊनच किर्ती ग्रुप थांबला नाही तर संवर्धनासाठीही किर्ती ग्रुप पुढे आला आहे. याशिवाय जेथे आवश्यक असेल तेथे मदतीसाठी किर्ती ग्रुप तत्पर असणार आहे. महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्या उपस्थितीत ही झाडे महानगरपालिकेला सुपूर्द करण्यात आली. शहरात वृक्षलागवडीच्या कार्यात सहभागी असणाऱ्या विविध संस्थांच्या मदतीने शहर व परिसरात या झाडांची लागवड केली जाणार आहे. त्याचे संवर्धनही केले जाणार आहे. शहरातील नागरिकांनी त्यांच्या परीने वृक्ष लागवडीमध्ये सहभाग नोंदवावा, प्रत्येकाने स्वतःच्या दारात किमान दोन वृक्ष लावावेत. हरित लातूरचे स्वप्न साकार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. केवळ झाडे लावण्याचे काम न करता त्यांचे संवर्धनही करावे, असे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी याप्रसंगी बोलताना केले. कीर्ती ग्रुपच्या पुढाकाराने वृक्ष लागवड व संवर्धनाच्या चळवळीला आणखी गती मिळणार असल्याचेही त्यांनी नमूद करत या कार्यात पुढाकार घेतल्याबद्दल कीर्ती ग्रूपचे त्यांनी आभारही मानले.

### वसई तहसील कार्यालयातील मडंळ ...

असतील तर माफी करा, जे रागावणे असतं ते कामासंदर्भात असतं व्यक्तिगत द्वेष भावना नसतं, असं भावुक होऊन सदगतीत होऊन आपले मनोगत व्यक्त केले. तदनंतर आयोजकांनी सर्वांचे उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. अशाप्रकारे दादाराव यांचा हा निरोप समारंभ उत्साहात साजरा झाला.

### लातूर जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कायद्याची...

असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष जिल्हा सल्लागार डॉ. माधुरी उटिकर यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची उद्दिष्टे व कार्य या बद्दल माहिती सांगितली. कोटपा २००३ अंतर्गत जिल्ह्यातील विविध उपक्रम व कार्यवाही संदर्भात माहिती त्यांनी सांगितली.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, औरंगाबाद चे विभागीय अधिकारी अभिजीत संघई यांनी या प्रसंगी कोटपा कायद्यातील विविध कलम व अमलबजावणी या बद्दल विस्तृत माहिती दिली. अमलबजावणी अधिकारी यांची नेमणूक व कार्यवाही पूर्तते संदर्भात माहिती तसेच धूरमुक्त लातूर शहर अभियान राबविण्यासाठी पोलिस प्रशासन चे अपेक्षित असलेले सहकार्य व त्याचे निकष या बद्दल माहिती सांगितली. या कार्यशाळेस संपूर्ण जिल्ह्यातील ४० पेक्षा जास्त पोलिस अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा अधिकारी भातलवंडे पोलिस निरीक्षक व श्री जितेंद्र कदम तसेच डॉ लक्ष्मण देशमुख जिल्हा शल्यचिकिस्तक व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सतिष हरीदास यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे शेवटी जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे श्री बेंबरे यांनी तंबाखू विरोधी शपथ दिली व कु. शेडोळे यांनी सर्वांचे आभार मानले.

### नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ...

पीडितेने नोकरी व लग्ना साठी तगादा लावला असता तिला जातीवाचक शिवीगाळ करीत धमकविल्या प्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून वरिष्ठ पोलिस निरीक्षक मालोजी शिंदे यांनी पीडितेच्या तक्रारी वरून मनोहर विशे या विरोधात भादवी कलम ३७६(२) व अट्रोसिटी कायदा कलम ३(१) (डब्ल्यु) नुसार बलात्कार व अट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करीत आरोपीस अटक केली आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले हे करीत आहेत.

# मुंबई शहर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना खावटी किटचे पालकमंत्री अस्लम शेख यांच्या हस्ते वाटप

## अनुसूचित जमातीच्या बांधवांच्या समस्या सोडविण्याचे पालकमंत्र्यांचे निर्देश



**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई शहर जिल्हा परिसरातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना आज मुंबई शहराचे पालकमंत्री अस्लम शेख यांच्या हस्ते खावटी अनुदानाअंतर्गत अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना रेशन कार्ड, आधार कार्ड मिळविण्यासाठी तसेच इतर समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्यात येईल, असे श्री. शेख यांनी यावेळी सांगितले.

आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालय, मुंबई यांच्या वतीने आज अनुसूचित जमातीतील लाभार्थी कुटुंबांना खावटी अनुदान योजनेतील अन्नधान्य किटचे वाटप मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात वितरित करण्यात आले. यावेळी आमदार अमीन पटेल, जिल्हाधिकारी राजीव निवतकर, जिल्हा नियोजन अधिकारी श्री. बोरकर, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सुप्रिया चव्हाण आदी यावेळी उपस्थित होते. आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. कोरोना विषाणू संसर्गाच्या काळात अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना सहाय्यासाठी राज्य शासनाने खावटी अनुदान योजनेची अंमलबजावणी सुरू केली होती. त्यानुसार, मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील १९२४ कुटुंबे खावटी अनुदान योजनेसाठी पात्र ठरले आहेत.त्यामध्ये उपनगरमधील १८१८ आणि मुंबई शहरातील १०६ कुटुंबांचा समावेश आहे. आज झालेल्या कार्यक्रमात मुंबई शहरातील १०६ कुटुंबांपैकी १२ कुटुंबांना श्री. शेख व श्री. पटेल यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील १७६० कुटुंबांना खावटी अनुदानाचे प्रत्येकी २ हजार रुपये थेट बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. यावेळी श्री. शेख म्हणाले की, खावटी अनुदान योजनेत आणखी काही कुटुंबे पात्र ठरतात का याची पाहणी संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. जी कुटुंबे या योजनेच्या लाभापासून वंचित राहतील त्यांची पात्रता निश्चित करून योजनेचा लाभ द्यावा. मुंबई शहर व जिल्ह्यामध्ये असलेल्या अनुसूचित जमातीतील कुटुंबांना ओळखपत्र देणे, रेशन कार्ड वितरित करणे यासह इतर समस्या लवकरात लवकर सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. श्रीमती चव्हाण यांनी योजनेची माहिती देऊन लाभार्थी निवडीची प्रक्रियाबाबत माहिती सांगितली.

# पोलीस कर्मचाऱ्यांचे नवीन निवासस्थान व्हावे यासाठी गृहमंत्री यांच्याकडे साकडे!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेले पोलीस कर्मचाऱ्यांचे निवासस्थान व्हावे हि मागणी खुप दिवसापासुनची होती. यासाठी महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मुंबई येथील मंत्रालयातील दालनात भेट घेऊन राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी देवणीच्या वतीने निवेदन देण्यात आले. पूर्वी बांधण्यात आलेले कर्मचाऱ्यांचे निवासस्थान अतिशय जीर्ण झाल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून पोलीस कर्मचारी येथे वास्तव्यास नाहीत. बरेच पोलिस कर्मचारी हे उदगीर वरुण ये जा करतात, त्यामुळे येथील पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्याची गैरसोय होत होती, या सर्व गोष्टींचा विचार करून हे निवेदन देण्यात आले आहे. लागलीच गृहमंत्र्यांनी संबंधितांना आदेश देऊन तात्काळ मंजूर करण्यासाठी सूचना केल्या असल्याचे सांगण्यात आले गृहमंत्री यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे देवणी तालुकाध्यक्ष प्रा.डॉ.अनिल इंगोले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कन्नाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे देवणी कार्याध्यक्ष अनिल कांबळे, महादेव आवाळे उपस्थित होते.

# देवणी येथे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम



**देवणी/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना, युवासेना यांच्या कडून ग्रामीण रुग्णालय देवणी येथे शिवसेना जिल्हा प्रमुख शिवाजी माने यांच्या आध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम घेण्यात आले. ग्रामीण रूग्णालयातील आरोग्य अधिकारी कर्मचारी, तालुक्यातील गटप्रवर्तक, आशा कार्यकर्त्या, पत्रकार यांनी कोरोना काळामध्ये अतिशय उत्कृष्ट काम केल्याबद्दल शाल श्रीफळ देऊन कोवीड योद्धाचा सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हा प्रमुख शिवाजी माने यांनी आपल्या मनोगतामध्ये कर्मचारी, आशाताई, गटप्रवर्तक यांनी केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांना योग्य तो न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने तहसिलदार सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, महिला जिल्हा संघटक डॉ.शोभाताई बेंजरगे, युवा सेना संपर्क प्रमुख सुरज दामरे, युवासेना जिल्हा प्रमुख ॲड. राहुल मातोळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ निळकंठ सगर, तालुका अरोग्य अधिकारी डॉ.गुरमे, ज्ञानोबा चिटुपे, तालुका प्रमुख पंडीत भंडारे, रणजित दोडके, बालाजी बिरादार, कृष्णा इंगोले, दिपक बेळकोणे, लक्ष्मण रणदिवे, कृष्णा पिंजरे, यशवंत ठाकरे इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन मुकेश सुडे, संजय बिरादार, लक्ष्मण बिरादार, गणपत पाटील यांनी केले.

# वाड्यात नुकसानग्रस्त रहिवाशांना अन्नधान्य वाटप



**वाडा/वार्ताहर**

मागील आठवडाभर पावसाने अक्षरशः थैमान घातले असून या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेलटे येथील बंधारा वाहून गेला आहे, तर भिवंडी वाडा महामार्गाचे अनेक ठिकाणी खड्डे पडून रस्त्याची चाळण झाली आहे, खेडे गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील मोरी व रस्तेही वाहून गेले असल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तालुक्यातील सर्व नद्यांना पूर आला होता त्यामुळे नदीकाठच्या घरांमध्ये पाणी शिरले होते तर काही घरे कोसळून पडली आहेत. तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत देवळी उमरोठे (नदीचा पाडा) येथील रहिवासी महादू पवार, नितीन चौधरी, बुधाराम मुकणे यांची घरे मुसळधार पावसात कोसळून पडली आहेत, तर घरातील कपडे, धान्य भिजून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या कुटुंबांच्या परिस्थितीचा आढावा घेत त्यांची उपासमारी होऊ नये यासाठी त्यांना मदतीचा हात देत वाड्यातील सामाजिक कार्यकर्ते व संत रोहिदास सामाजिक शैक्षणिक, क्रीडा संस्थेचे अध्यक्ष भारत गायकवाड व जन ग्रामीण सेवा संस्थेचे अध्यक्ष अनंता वणगा, उपाध्यक्ष अरुण खुलात यांच्या हस्ते अन्नधान्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी उमरोठे गावचे रहिवासी सुनील पाटील, टायगर ग्रुप सदस्य नितेश आंबवणे आदी उपस्थित होते. ग्रुप ग्रामपंचायत देवळी मानिवलीचे सदरच्या पाड्यावर अत्यंत दुर्लक्ष असून रहदारीसाठी रस्ता सुद्धा नाही अशी खंत वणगा यांनी व्यक्त करून ग्रामपंचायतीने या पाड्यासाठी रस्त्याची सोय करावी अशी मागणी केली आहे.

# आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी देवणीत कोरोनाने मृत्यू पावलेल्या कुंटुबियाचे केले सांत्वन!

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेमध्ये अनेक कुटुंबातील सदस्यांना आपले जीव गमवावे लागले. कुटुंबातील सदस्याच्या अचानक जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेल्या अचवला येथील ग्रामप्रंचायत सदस्य कै स्वरा पाटे, विळेगांव येथील काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अजित बेळकोणे यांचे बंधु व आईचे कोरोनामूळे मृत्यु पावले होते. व तसेच विळेगांव येथील कै.नागराळे व देवणीचे माजी नगराध्यक्ष वैजनाथ अष्टूरे यांचे बंधूचे कोरोणामूळे निधन झाले होते. यांच्या घरी व नेकनाळ येथील कै.शिवाजी बिरादार यांच्या कुटुंबाला माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी भेट देऊन कुटुंबातील सदस्यांचे सांत्वन केले. भविष्यात कोरोना संसर्गापासून काळजी घेण्याची विनंती केली.



भविष्यात जर मुला-मुलीच्या शिक्षणाकरिता व कुटुंबासाठी कौटुंबिक अडचण आली, तर सदैव मी आपल्या परिवारासोबत राहून मदत करेन असे सांगितले व कुटुंबातील सदस्यांना आ.संभाजी पाटील यांनी धिर दिले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष काशिनाथ गरिबे, जेष्ठ नेते हावगीराव पाटील, सभापती सविता पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रंशात पाटील जवळगेकर, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर पटणे, चेअरमन दगडु सोंळुखे, भगवान दादा पाटील तळेगांवकर, जि.प.सदस्य रामभाऊ तिरुके, पृथ्वीराज शिवशिवे, तुकाराम पाटील, उपसभापती, शंकर पाटील, बाबुराव इंगोले, अमर पाटील, मयुर पटणे, सत्यवान कांबळे, ओम धनुरे, रमेश मन्सुरे, भाजयुमो तालुका अध्यक्ष रामलिंग शेरे, माजी सभापती बालाजी बिरादार, प्रंशात पाटील, सुधीर भोसले, शहराध्यक्ष अट्टल धनूर, सोमनाथ बोरोळे, राज गुणाले, संरपंच हंणमंत बिरादार आदीसह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# २२ वर्षीय तरुणीच्या पोटात निघाला तब्बल बारा किलो मासाचा गोळा

**लातूर/प्रतिनिधी**

एका २२ वर्षीय तरुणीच्या पोटाची शस्त्रक्रिया करुन पोटामधील अंडाशयात वाढलेला तब्बल बारा किलोचा मासाचा गोळा (ओव्हेरियन ट्युमर) बाहेर काढून गुंतागुंतीची व अतिशय अवघड शस्त्रक्रिया एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कांती केंद्रे-सिरसाट आणि त्यांच्या चमुने यशस्वी करुन तरुणीला जीवदान दिले आहे. निराली पटेल (नाव बदलून) या तरुणीला गेल्या अनेक वर्षापासून पोटदुखीचा त्रास होत होता. दरम्यान या तरुणीची यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. क्रांती केंद्रे-सिरसाट यांनी प्राथमिक तपासणी केली असता तिच्या पोटात मासाचा गोळा (ओव्हेरियन ट्युमर) असल्याचे निदर्शनास आले. यामुळे तरुणीला रुग्णालयात दाखल करुन तिच्या पोटाची सोनोग्राफी, सिटीस्कॅनसह अवश्यक तपासण्या



केल्या असता अंडाशयात मासाची मोठी गाठ असल्याचे निदान झाले. अशा स्वरुपातील गाठ अधिक काळ पोटात राहाणे धोक्याचे असल्याने नातेवाईकांना आजाराबद्दल माहिती देवून डॉक्टरांनी सदरील तरुणीच्या पोटाची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. सी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. क्रांती केंद्रे-सिरसाट यांनी निरालीच्या पोटाची शास्त्रक्रिया करुन तिच्या पोटातील अंडाशयातील बारा किलोचा मासाचा गोळा सव्वा तास चाललेल्या शस्त्रक्रियेतून वेगळा करुन यशस्वीपणे बाहेर काढला. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. आरती माने, डॉ. प्रिती कांबळे यांनी सहाय्य केले. तर भूल तज्ज्ञ म्हणून डॉ. टी. के. कारंडे यांनी सेवा बजावली. काही दिवसांच्या उपचारानंतर नुकतीच या तरुणीला रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. सध्या तिची प्रकृती चांगली असून शस्त्रक्रियेपुर्वी होत असलेला त्रासही कमी झाला आहे. दरम्यान हार्मोन्सचे प्रमाण कमी-जास्त झाल्याने, विषाणू संसर्गाने व शरिरातील इतर विकारामुळे जन्मजात, बाल वयापासून ते वयोवृध्द अवस्थेपर्यंत महिलांना पोटात गाठ (ओव्हेरियन ट्युमर) वाढणे हा आजार होऊ शकतो. अशा गाठी अंडाशय, गर्भाशय व आतड्यात होऊ शकतात. या आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना पोटदुखीचा त्रास होतो अथवा काहीच त्रास होत नाही, उलट्या होणे, पोटातील गाठीला पिळ पडल्यास ताप येणे व मासीक पाळीत अडचणी निर्माण होणे, अती रक्तस्त्राव होणे अशी लक्षणे दिसून येतात. महिलांमध्ये १० ते २५ या वयोगटात अंडाशयाचा कर्करोग होण्याचे प्रमाण अधिक आहे. पोटात वाढलेल्या गाठीकडे दुर्लक्ष केल्यास कालांतराने अशा गाठीचे कर्करोगात रुपांतर होऊ शकते. त्याचबरोबर पोटातील गाठ फुटून रक्तस्त्राव होऊन रुग्णाच्या जिवितास धोकाही होऊ शकतो. त्यामुळे पोटात गाठ असल्याचे निदान झाल्यास अथवा तशी लक्षणे दिसून आल्यास महिलांनी दुर्लक्ष न करता तात्काळ उचार घ्यावेत असे आवाहन स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ कांती केंद्रे-सिरसाट यांनी केले आहे.

# थोडक्यात वृत्तांत

## शिवसेनेचा लातुरच्या महाविद्यालयाला दणका

लातूर : वारंवार मागणी करूनही महाविद्यालय सोडल्याचा दाखला न देणारे दयानंद महाविद्यालय शिवसेनेच्या दणक्यानंतर अखेर वरमले. ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडण्याचा दाखला मिळवण्यासाठी अर्ज केले होते अशांना तात्काळ दाखले यामुळे मिळू शकले. परिणामी विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले. अनेक विद्यार्थी लातूरच्या नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेतात परंतु काही कारणाने अकरावीनंतर त्यांना महाविद्यालय सोडावे लागते. अशा विद्यार्थ्यांनी अर्ज करूनही दयानंद महाविद्यालयातून महाविद्यालय सोडल्याचा दाखला दिला जात नव्हता. ही बाब शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना लक्षात आली. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन दाने, युवासेनेचे जिल्हाप्रमुख राहुल मातोळकर, संपर्क प्रमुख प्रा.सुरज दामरे, उपजिल्हाप्रमुख रवी पिचारे,कुलदीप सूर्यवंशी यांनी महाविद्यालय प्रशासन व संस्थाचालकांशी संपर्क साधला.संस्थेचे प्रमुख लाहोटी, रमेश बियाणी यांच्याशी चर्चा करून विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी त्यांना सहकार्य करण्याची विनंती केली.यामुळे महाविद्यालय प्रशासनाने अखेर नमते घेतले. परिणामी महाविद्यालय सोडल्याचा सोडण्याचा दाखला विद्यार्थ्यांना मिळू शकला. यामुळे विद्यार्थ्यांनी शिवसेना व युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.विशेष म्हणजे शिवसेना पक्षप्रमुख,मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशीच हा प्रसंग लातुरात घडला.पदाधिकारी विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहिल्याबद्दल पालकांनीही मुख्यमंत्र्यांचे आभार मानत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## अहमदपूरात वानरांचा धुमाकूळ

अहमदपुर : अहमदपूर शहरात वानराचा मोठ्या प्रमाणात वावर वाढल्याने नागरीक भयभीत होऊन जिवन जगत असल्याने सदरील वानराचा त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी एका शिष्टमंडळाने तहसीलदार यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. अहमदपूर शहरातील अनेक भागात विशेषताहा लेक्चर कॉलणी, टेंभुर्णी रोड वरील गणेश नगर, सैनिक कॉलनी येथे सदरील अनेक वाणरे सकाळी व संध्याकाळी अनेकांच्या घराच्या संरक्षण भिंतीवर वावरत असतात घराचा दरवाजा उघडा दिसताच अचानक घरात प्रवेश करुन खाण्याच्या दिसेल त्या वस्तू बिनधास्त पणे घेऊन जात असतात.तेवढ्यात कोणी वानराला विरोध केला तर चक्क चवताळून अंगावर येत असल्याने मोठे भितीचे वातावरण निर्माण झाले असून लहान मुलांना तर जिव मुठीत धरून वावरावे लागत असल्याने स्थानिक नागरिक भयभीत झाले असल्याने याचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन मनोहर पाटील, गोविंदराव गिरी, सौ.मिनाक्षीताई शिंगडे, आर.जी. कांबळे, प्रविण शिंगडे, यांनी अहमदपुर च्या तहसीलदारांना दिले आहे. सदरील निवेदनावर डॉ.सतीष केंद्रे, शरद कांगणे, प्रा.अनिल मुंडे, शिवराज शेळके, राघवेंद्र गादेवार, बाशिदखॉ पठाण, रवि महाजन, गोविंदराव गिरी, महेश लोहारे, शिवकुमार उडगे,आर.जी. कांबळे, सुप्रीय बनसोडे, रमेश कांबळे, सुजीत गायकवाड, पांडुरंग केंद्रे, गजानन नखाते, सिद्धेश्र्वर गुट्टे, अनुराधा केंद्रे, शिवगंगा गवळे, नितीन नारागुडे, जी.वाय. गायकवाड, वसंत तिडोळे,निरज लाटकर, जी.टी.घोगरे, शेकडे बी.डी.यांच्या सह शहरातील लेक्चर कॉलणी, गणेश नगर, सैनिक कॉलणी टेंभुर्णी रोड येथील अनेकांच्या स्वाक्षरी आहेत.

## पशुधन पर्यवेक्षकांच्या मागण्यासाठी पाठपुरावा करणार

अहमदपूर : पशुसंवर्धन पर्यवेक्षकांनी विविध मागण्यां संदर्भात संपावर जाण्याचा निर्धार केल्याने आज अहमदपुर येथे लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे यांची पशुसंवर्धन पर्यवेक्षकांनी भेट घेऊन रितसर निवेदन सादर केले असता राहुल केंद्रे यांनी सदरील संघटनेला पाठींबा दर्शवून सदरील मागण्या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी दिले. पुढे बोलताना राहुल केंद्रे म्हणाले की आपल्या लातूर जिल्हा परिषद स्तरावरच्या मागण्या येथेच सोडवू आणि राज्यातील विरोधी पक्ष म्हणून आपणास न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे आश्र्वासन यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी यावेळी दिले.आपल्या मागण्या न्याय्य असून मुंबई येथे पशुसंवर्धन मंत्र्यांना आम्ही प्रत्यक्ष भेटून अन्यायकारक निघालेला जीआर रद्द करण्यास भाग पाडले आहे. यापुढेही आम्ही आपल्या सोबत आहोत. तुमचा संबंध प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या पशुधना सोबत येत असल्यामुळे जरी आपण संपात सहभागी झालात तरी पण शेतकऱ्यांच्या कठीण परिस्थिती मध्ये आपल्या कर्तव्याचा विसर न पडता त्यांना मदत होईल असेच आपण कार्य करत राहावे. जिल्हा परिषद प्रशासन म्हणून आम्ही आपल्या सोबत आहोत असेही शेवटी लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी सांगितले.

**जिल्हा परिषद, पालघर**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग पालघर**
**जा. क्रं/ग्रापापू/पापूवि/निविदा/०२**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर जिल्हा परिषद, पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांच्या सर्वेक्षण कामाकरीता (Carrying out survey and allied work in palghar district as and when required Dist. Palghar) निविदा Online द्वारे मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
- सदरची निविदा दि. २८/०७/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून ते दि. ०३/०८/२०२१ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत Download करता येईल.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahaetenders.gov.in या संकेतस्थाळावरुनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकरी अधिकरी जि. प. पालघर यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद पालघर

**जाहीर नोटीस**

मी सोनाली किशोर बागडे असे लिहून देते की, माझे पती किशोर कुंडलीक बागडे हे दि. ०९/०५/२०२१ रोजी मयत झाले. त्यांच्या मालकीची रिक्षा नंबर MH-48-N-4673 अशी आहे. त्याचे परमीट नंबर MH48/6631B2015 व ते १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत व्हॅलीड आहे. तरी ती रिक्षा व परमीट पत्नी या नात्याने माझ्या नावावर ट्रान्सफर करणार आहे. तरी याबद्दल कोणाही व्यक्तीस याचा विरोध किंवा हरकत असेल तर त्यांनी सात (७) दिवसांचे आत आम्हाला येऊन भेटावे किंवा संपर्क करावा ही विनंती.

सही/-
**सोनाली किशोर बागडे**
(मोबा.नं. ८२०८८०६९९४)